वर्ष १० वें अंक ३ रा

२१ फेब्रुवारी १९५९

# संजीवन

## जीवनाच्या सर्वांगीण विकसनार्थ त्रैमासिक



संजीवन कार्यालय, श्रीअरविंद आश्रम, पाँडिचेरी – २

१९५९

अत्यंत कठीण, ताठर, आकुंचित आणि श्वासरोधक अचेतनाच्या अगदीं तळाला एका सर्वसमर्थ शक्तिकेंद्रावर येऊन मी धडकलें, ज्यामुळें तत्क्षणीं, नूतन जगताचीं बीजें स्पंदन पावत असलेल्या निराकार, असीम विस्तारामध्यें मी वर फेंकलीं गेले.

—— श्रीमाताजी

CWM Vol 15 : Page 186

वर्ष १० अंक ३ रा २१ फेब्रुवारी १९५९

# संजीवन

## जीवनाच्या सर्वांगीण विकसनार्थ त्रैमासिक



संपादकः

भालचंद्र लिमये

**संजीवन कार्यालय**

**श्रीअरविन्द आश्रम, पाँडीचेरी**

# १२ फेब्रुवारी १९५९

(वसंत पंचमी)

अंधःकार जरी अत्यधिक असला——आणि हें जग व मनुष्याची भौतिक प्रकृति-सुद्धां त्यानें भरून गेलेली आहेच——तरी, सत्य प्रकाशाचा एकादा किरणहि त्याच्या दसपट अंधःकारावर शेवटीं विजय मिळवूं शकतो. यावर विश्वास ठेवा व त्यालाच नेहमीं चिकटून रहा.

२९. १२. ३२ CWSA : Vol 29 : Page 102

——श्रीअरविन्द

वार्षिक वर्गणी——यथाशक्ति.

संपादक——भालचंद्र लिमये.
प्रकाशक——'संजीवन कार्यालय', श्रीअरविंद आश्रम, पांडीचेरी.
मुद्रक——श्रीअरविंद आश्रम प्रेस, पांडीचेरी.
44/59/1/850



श्रीमाताजी

# २१ फेब्रुवारी १९५९

मन हें भेदमूलक विरोधाभासांचें जनक आहे; त्यामध्यें, भगवंताच्या व्यक्तिगत आणि निर्व्यक्तिक किंवा त्याच्या 'एकं' आणि 'बहु' या अवस्थांप्रमाणेंच त्याच्या विश्वातीत व वैश्विक अवस्थेमध्येंहि कायमचीच विसंगति असावयाची असें मानलें जातें. पण त्याच्या उलट, अतिमानसिक चेतना ह्या समस्या निर्माण करीत नाहीं; कारण तेथें मानसिक अज्ञानाची अनुभव-पद्धति नाहींशीं केलेली असते आणि एक अच्छेद्य एकता हा तेथें सर्व गोष्टींचा आधार असतो—कोणत्याहि अभिव्यक्तीनें ही एकता (जी संख्यावाचक नसून मूलभूत असते.) कमी होऊं शकत नाहीं किंवा तिला विरोध होऊं शकत नाहीं; तर उलट, जी विश्वातीत सद्वस्तु ती व्यक्त करीत असते तिचा आलंब कधींच न सोडतां, त्या एकतेमध्येंच व तिच्याच साह्यानें ती अभिव्यक्ति रहात असते. अतिमानस आणि मन यांतील हा फरक मनाला संपूर्णतया समजाविणें कठीण आहे; कारण मनाच्या तर्कपद्धतीच्या अगदीं विरुद्ध अशी स्वयंप्रकाशमय ज्ञानग्रहणपद्धति अतिमानस आणते. तादात्म्य द्वारां ज्ञान हें अतिमानसाचें मूळ असतें तर, अशा ज्ञानाचें फार तर केवळ एक अस्पष्ट प्रतिबिंब किंवा छाया मन आकलन करून घेऊं शकतें. परंतु चेतनेच्या संभाव्यतांमध्यें मात्र यामुळें फारच मोठा फरक पडतो; आणि हा फरक विचारद्वारां नव्हे तर केवळ अनुभूतिद्वारांच जाणणें शक्य असते.

Darshan Day Message on 21 February, 1959

—श्रीअरविन्द

# अनुक्रमणिका


| | विषय | | पान |
|---|---|---|---|
| १ | प्रार्थना आणि ध्यान | श्रीमाताजी. | ५ |
| २ | श्रीमाताजींचीं प्रवचनें-<br>• कांहीं व्यक्तिगत प्रसंग<br>• खरा एकांत | श्रीमाताजी | ८ |
| ३ | श्रीमातृवाणी | श्रीमाताजी | १६ |
| ४ | ये यथा मां प्रपद्यन्ते | श्रीअरविंद. | २१ |
| ५ | आगमन-(एक रूपक) | गजराज | २२ |
| ६ | जगन्नाथाचा रथ | श्रीअरविंद | २५ |
| ७ | भारतीय धर्माचीं मूलतत्त्वें. | श्रीअरविंद. | २९ |
| ८ | तारुण्य | श्रीमाताजी | ३१ |
| ९ | वाचकांचे प्रश्न | रेवान् | ३२ |
| १० | साधी रहाणी (विद्यार्थ्यांसाठीं.) | श्रीमाताजी. | ३५ |
| ११ | दिव्य जीवन | श्रीअरविंद. | ४१ |
| १२ | आंतरात्म्याचें उद्घाटन | श्रीअरविंद. | ४४ |
| १३ | साधकांना पत्रें | श्रीअरविंद. | ४६ |

वर्ष १० अंक ३ रा २१ फेब्रुवारी १९५९

# संजीवन



तमसापलीकडील उच्चतर ज्योति पहात,
देवतांमधील दिव्य सूर्याप्रत, सर्वोच्च ज्योतिप्रत आम्ही आलो.

ऋग्वेद–१.५०.१०

---

## प्रार्थना आणि ध्यान

१९ फेब्रुवारी, १९१४.

हे प्रभु, तूं माझ्या विचारांमध्यें सदैव उपस्थित रहा! मागणी या स्वरूपांत मीं हें म्हणत नाहीं; कारण मला माहीत आहे कीं, तुझें सान्निध्य निरंतर आणि सार्वभौम आहेच. मी हें जाणतें कीं, जे कांहीं आम्ही पाहतो तें किंवा जें कांहीं आमच्या दृष्टिपथांतून सुटतें तेंहि सर्व तुझ्याच अद्‌भुत हस्तप्रक्षेपानें, तुझ्याच दिव्य प्रेमाच्या सत्तेमुळें घडत असतें. पण मी पुनः पुनः तुला हें निवेदन करतें व प्रार्थनाहि करतें याचें कारण येवढेंच कीं, मीं हें तथ्य विसरूं नये, त्याकडे दुर्लक्ष करूं नये.

ज्यामुळें वस्तुमात्राचें रूप अगदीं बदलून दिव्य होऊन जाईल, उजळून जाईल, ज्यामुळें सर्वठायीं शांति आणि उदार संतोष निर्माण होईल इतकें संपूर्ण तादात्म्य तुझ्या सजीव प्रेमाशीं प्राप्त करून घेणें खरोखर किती भाग्याचें!

तुझ्या सर्वदर्शी आणि पवित्र दिव्य प्रेमाशीं एकरूपत्वाच्या अवस्थेंत सर्वत्र आणि सदैव राहणें ह्यांत खरोखरी केवढी धन्यता आहे!

CWMCE Vol 01 : Page 78

*

२० फेब्रुवारी, १९१४.

तुझ्याशीं तादात्म्य पावण्याची अधिकाधिक इच्छा करणें, तुझ्या एकमेवाद्वितीय चेतनेशीं आमची चेतना एकरूप करणें, तुझ्या सार्वभौम सत्तेचें, तुझ्याच प्रेमळ इच्छेचें अधिकाधिक

शांत, निश्चल, अनासक्त आणि समर्थ सेवक होणें हीच एक गोष्ट करण्यासारखी आहे; तिचेंच खरें महत्त्व आहे.

हे प्रभो, संपूर्ण निःस्वार्थ-भावाची शांति मला प्रदान कर, तुझें सान्निध्य सफल करणारी, तुझा हस्तक्षेप परिणामकारी करणारी शांति मला दे. मला ती शांति हवी आहे, जी समस्त अशुभ संकल्पांवर, अशुभ कामनांवर, समस्त अंधःकारावर सदा विजय मिळविते.

हे सर्वाधीशा, अति विनम्रतेनें मी तुला प्रार्थना करीत आहे कीं, मी माझ्या नियत कार्याच्या थोरवीस योग्य व्हावें; तुझ्या पवित्र कार्याची उपेक्षा ज्यामुळें होईल व ज्यामुळें तुझ्या आदेशाची अवज्ञा होईल असें कांहींहि, कळत वा न कळत, माझ्यामध्यें राहूं नये.

निःशब्द भक्तिभावानें मी तुला वंदन करतें. CWMCE Vol 01 : Page 79

★

२१ फेब्रुवारी,१९१४.

प्रतिदिन, प्रतिक्षण ही नूतन आणि पूर्णतर समर्पणाची संधि ठरली पाहिजे; अर्थात् अतिउत्साही, व्यग्र, अतिरजोगुणी आणि कार्याविषयींची भ्रामक समजूत असलेल्या समर्पणाची संधि नव्हे तर अत्यंत गंभीर, आणि निःशब्द, बाह्यतः प्रतीत न होणाऱ्या पण प्रत्येक कृतीला व्यापून ती परिवर्तित करणाऱ्या आत्मदानाची संधि ठरली पाहिजे. एकांतमय व स्वस्थ विश्रांत असें आमचें मन नेहमीं निवांतपणें तुझ्या ठिकाणीं राहिलें पाहिजे; आणि या उच्चतम पवित्र शिखरावरून त्याला वस्तुस्थितीचें अचूक आकलन झालें पाहिजे. सर्व अस्थिर व अचिरंतन आभासांच्या मागें वसत असलेल्या एकमेव शाश्वत सत्याचें आकलन झालें पाहिजे.

हे प्रभो ! संताप व विषाद यांचा निरास होऊन माझें हृदय पवित्र बनलें आहे; तें दृढ व शांत आहे. प्रत्येक वस्तूचे ठिकाणीं तें तुलाच पहात आहे. भविष्यकाळासाठीं कोणतेंहि बाह्य कर्म, कोणतीहि परिस्थिति आमच्याकरितां ठेवलेली असली तरीहि मला माहीत आहे कीं, एकमात्र तूंच विद्यमान आहेस, तुझ्या अविकारी शाश्वततेमध्यें एकमात्र तूंच सत्य आहेस आणि तुझ्यासाठींच आम्ही सर्व जगत आहोंत.

अखिल अवनीवर शांति नांदो ! CWMCE Vol 01 : Page 80

★

२२ फेब्रुवारी, १९१४

ज्यावेळीं मी सुमारें तेरा वर्षांची होतें, त्या वेळेपासून जवळ जवळ एक वर्षभर दररोज रात्रीं, मी झोंपल्याबरोबर मला असें वाटत असें कीं, माझ्या शरीरांतून मी बाहेर आलेली असून घराच्या अगदीं वर वर उंच सरळ आकाशांत चालली आहे, शहराच्याहि वर चालली आहे. त्यावेळीं मी एक सुंदर सुवर्णमय धाग्यांचा, माझ्याहून मोठ्या आकाराचा झगा परिधान केलेला आहे, आणि मी जसजशी वर जाईन तसतसा तो मोठा होत आहे व माझ्या भोंवतींचा त्याचा घेर वाढत जाऊन जणुं कांहीं त्यायोगें सबंध शहराला एक मोठें अवाढव्य छतच घातलें गेलें आहे, असें मला दिसत असे. नंतर असें दिसें कीं, सर्व बाजूनीं पुरुष,

स्त्रिया, मुलेंबाळें, वृद्ध, रोगी, दुःखीकष्टी माणसें येत आहेत आणि झग्याच्या पसरलेल्या घोळामध्यें तीं एकत्रित होत आहेत, सहायतेसाठीं याचना करीत आहेत, आपले दुःख, कष्ट, यातना, भोग सर्वकांहीं मला निवेदन करीत आहेत. त्यांच्या याचनेस उत्तर म्हणून माझ्या झग्याचा लवचिक व जणुं जिवंत झालेला घोळ प्रत्येकाकडे पसरला जाई; आणि त्यांनीं त्याला स्पर्श करतांच त्यांचें सांत्वन होई; तें रोगमुक्त होत आणि ते जेव्हां पुनः परत जात त्यावेळीं ते इतके प्रसन्न व बलवान् होऊन जात कीं, माझ्याकडे येण्यापूर्वीं त्यांची तशी स्थिति कधींच नसे. त्या अनुभवाइतकी दुसरी कोणतीच गोष्ट मला आनंदपूर्ण व रमणीय वाटत नसे. हा रात्रींचा अनुभव हेंच 'माझें खरें जीवन' असें मला वाटे. त्याच्याशीं तुलना करतां दिवसभरांतील सर्व कामें मला नीरस, कंटाळवाणीं व निर्जीव भासत. अशा प्रकारें मी वर वर जाई तेव्हां, पुष्कळवेळां माझ्या डाव्या बाजूस एक वृद्ध माणूस मी पहात असे. तो मूक आणि स्थिर असे. तो मजकडे त्यावेळीं कृपापूर्ण प्रेमळपणानें पहात आहे असें दिसे. त्याच्या सान्निध्यानें मला उत्साह वाटे. करडया जांभळया रंगाचा लांब झगा घातलेला हा वृद्ध माणूस म्हणजे 'दुःखमूर्ति मानवतेचें प्रतीकरूप' होता हें मला मागाहून समजून आलें.

हा जो गंभीर व अवर्णनीय अनुभव मला आला, सत्यदर्शन मला झालें त्याचें माझ्या मेंदूमध्यें जें कांहीं रूपांतरित स्वरूप स्थिर झालें आहे, तें मी असें वर्णूं शकेन—

अनेक वेळां दिवसां व रात्रींहि मला असें वाटे— मी, म्हणजेच माझी सर्व जाणीव, पूर्णपणें माझ्या हृदयस्थानीं एकवटली आहे; हें हृदय म्हणजे शरीराचा अवयव किंवा एकादें भावनाकेन्द्र नसून ते दिव्य, निर्व्यक्तिक व सनातन असें प्रेमच आहे. असें दिव्यप्रेम बनल्या-मुळें समस्त अवनीतलावरील हरएक वस्तूच्या अंतर्यामीं, केन्द्रभागीं मी निवास करीत आहे अशी प्रतीति मला येत आहे. त्याचवेळीं मला असेंहि वाटत आहे कीं, माझे कितीतरी, असंख्य, अनंत हात मी पुढें पसरत आहे आणि अखिल प्राणिमात्रास एकत्र करून, आलिंगून, विश्वापेक्षांहि अधिक विशाल अशा माझ्या हृदयावर अमर्याद कनवाळूपणानें मीं त्यांना कवटाळलें आहे . . . . . शब्द तोकडे पडत आहेत, बेढब होत आहेत. हे दिव्य प्रभो, खरेंच मनाची भाषा नेहमीं अशीच बालिश, बोबडी असणार! . . . . . पण तुझ्या प्रीत्यर्थ असलेली माझी अभीप्सा मात्र अनवरत आहे, आणि खरें सांगावयचें तर, तुझ्या अभिव्यक्तीचें अपूर्ण साधन असलेल्या या माझ्या देहांत बहुशः तूंच स्वतः, केवळ तूंच एकटा वास्तव्य करीत असतोस.

तुझ्या उज्ज्वल प्रकाशाच्या शांतीमध्यें सर्व प्राणी आनंदी, सुखी राहतील असें वरदान दे.

—श्रीमाताजी.

# श्रीमाताजींचीं प्रवचनें

## कांहीं व्यक्तिगत प्रसंग

-१-

तुम्हीं फारफार धीराचें असलें पाहिजे. तुमच्या ठिकाणीं चिकाटी व प्रयत्नसातत्य असलें पाहिजे. मी तुम्हांला एक गोष्ट सांगते–माझी स्वतःचीच आहे ती.

जेव्हां मी गूढ विद्येचा अभ्यास करूं लागले, त्यावेळीं प्रथम माझ्या निद्राकालाविषयीं-झोंपेंतहि जागृत राहण्याच्या अभ्यासापासून मीं सुरुवात केली. त्यावेळीं मला असें आढळून आलें कीं, प्रत्यक्ष जड जगतांतील भावनामय प्रांत ( most material Vital ) आणि सूक्ष्म-भौतिक ( Subtle Physical ) प्रांत यांच्या दरम्यानचा एक लहानसा प्रांत, अगदीं लहानसा भाग, हा तितकासा विकसित झालेला नाहीं; या दोन्ही प्रांतांना जोडणारा जागृत दुवा या दृष्टीनें तितकी क्षमता वाढलेली नाहीं. त्यामुळें प्रत्यक्ष भौतिक भावनांच्या पातळीवर जें कांहीं घडत असे त्याची जशीच्या तशी तंतोतंत नोंद सूक्ष्म भौतिक पातळीवर बरोबर केली जात नसे. मधला मार्ग जणुं तुटलेला होता; मध्यंतरींचा हा प्रदेश अगदींच रिता, मोकळा होता असें नव्हे, पण तेथें अर्धवट जाणीव होती, संपूर्णतया जाणीवेचा विकास तेथें झालेला नव्हता. अर्थात् मला माहीत होतें कीं, याला एकच मार्ग आहे; आणि तो म्हणजे त्या भागाचा विकास व्हावा, तो जाणीवपूर्ण व्हावा म्हणून प्रयत्न करीत रहावयाचें. साधारणतः मला वाटतें मीं फेब्रुवारीमध्यें केव्हांतरी या प्रयत्नास, अभ्यासास सुरुवात केली. महिना लोटला, दोन महिने झाले, तीन चार महिने गेले, पण कांहींच यश दिसेना, मी आपला प्रयत्न करीत राहिले. पांच महिने झाले, सहा महिने झाले. नंतर जुलै किंवा ऑगस्टच्या सुमारास मी पॅरिस सोडून एका खेडेंगांवीं गेले. समुद्र-किनाऱ्यावरचें अगदीं लहानसें गांव होतें तें; मी तेथें कांहीं स्नेही-मंडळीबरोबर रहात होते. तेथें एक बाग होती. बागेमध्यें हिरवीगार सुंदर हिरवळ पसरलेली होती, भोंवतालीं सर्वच झाडें आणि फुलें फुललेलीं होती. फारच सुंदर, चिमुकली, निवांत जागा होती ती. तेथें विशेष शांतता, स्तब्धता होती. एके दिवशीं त्या हिरवळीवर कोपरें टेंकून मी पालथी पडले होते. एकदम अचानकपणें भोंवतालच्या निसर्गातील सर्व झाडेंझुडपें, सारा निसर्गच, भोंवतालचा सारा प्रदेशच, अगदीं अनपेक्षित, कांहीं बदल न होतां एकदम जिवंत झाला, भारून गेला, जागृत झाला. सारें वातावरण अद्भुतरम्य व सजीव वाटूं लागलें. गेले सहा महिने कांहीं यश न येतांहि जो मी अविरत प्रयत्न करीत होते, त्याचा तो परिणाम होता. मला मात्र कल्पनाहि नव्हती; साधी थोडीशी अनुकूल परिस्थिति मिळाली आणि एकदम परिणाम दिसून आला. अंड्यामध्यें पिलूं असतें ना ? तशी ही अवस्था असते. बरेच दिवस तें त्यामध्यें असतें पण आपल्याला तें दिसत नाहीं. कांहीं वेळां तर आपल्याला शंका येते कीं, अंड्याच्या आंतमध्यें कांहीं आहे कीं नाहीं ? पण एक दिवस अचानक

अंड्याला तडा जातो, लहानसें भोंक पडतें, अंडें फुटतें, पिलूं बाहेर येते; पूर्ण तयार झालेलें, सर्वांगपूर्ण व सुडौल. पण त्यापूर्वीचा सर्व काळ तें तयार होण्यासाठीं लागलेला असतो. तुमचीहि अशीच गोष्ट असते. आपल्या अंतरंगामध्यें जेव्हां कांहीं आकारास आणण्याची तुमची इच्छा असते, प्रयत्न असतो तेव्हां, अंड्यामधील पिलासारखें तुम्हांला तयार व्हावयाचें असतें. दीर्घकाळ प्रयत्न करूनहि यत्किंचितहि यश येत नाहीं. पण त्यामुळें निराश होतां कामां नये. प्रयत्न करण्यासाठीं जणुं कांहीं अनंतकाळ आपणांसमोर आहे या भावनेनें आणि फलाविषयीं पूर्ण अनासक्त राहून तुम्हीं पूर्वीप्रमाणेंच नियमितपणें प्रयत्न करीत राहिलें पाहिजे. एक दिवस तुमच्या सर्व खटाटोपाचें सारें फल अचानकपणें तुमच्या हातीं पडेल.

CWMCE Vol 06 : Page 186

-२-

मी जेव्हां लोकांकडे पाहते, त्यांच्याशीं मी जेव्हां कांहीं निमित्तानें संबंध प्रस्थापित करून व्यवहार करीत असते, त्या त्या वेळीं माझा असा संकल्प असतो, प्रयत्न असतो––अर्थात् हें नेहमींच शक्य असतें असें मी म्हणत नाहीं––तरीपण त्या प्रत्येक वेळीं त्यांच्या ठिकाणचा आंतरात्मा ( Psychic Being ), त्यांचें ध्येय, त्यांना काय करावयाचें आहे तें, त्यांना काय काय व्हावयाचें आहे तें, हें सर्व जाणून तो भाग हातीं धरून जणुं तो पृष्ठभागावर आणण्याचा माझा प्रयत्न असतो. हेंच माझें खरें मुख्य काम असतें. मी जें काय त्यांच्या-ठिकाणीं पाहते तें बाहेर, पुढें आणण्याचा मी यत्न करीत असते. ज्यावेळीं मी हें करीत असते, त्यावेळीं लोकांची बाह्य जाणीव कोणत्या प्रकारची आहे किंवा ती किती मर्यादेपर्यंत पोहोंचलेली आहे, त्यामध्यें ते कितपत जागृत आहेत, यांविषयीं मला नेहमींच निश्चिति असते असें नाहीं––अर्थात् जे लोक कांहीं प्रमाणांत जागृत असतात त्यांचीं उदाहरणें सोडून द्यावयास पाहिजेत. मीं जें आंत पाहिलेलें असतें तें आणि त्या व्यक्तीस ज्याची जाणीव आहे तें, या दोहोंमध्यें कितपत फरक आहे हें जाणून घेण्याच्या उद्देशानें मी कोणाकोणाला प्रश्न विचारते. मी नेहमींच हें असें करीत राहिलेली असते, आणि त्यामुळें लोकांची मात्र अशी समजूत होते कीं, मला कांहींच माहीत नाहीं.

तुमचें स्वतःविषयींचें ज्ञान आणि मला तुमच्याविषयीं असलेलें ज्ञान, यांमध्यें जमीन-अस्मानाचें अंतर असतें. अर्थातच, हें स्पष्टच आहे कीं, तुम्हीं काय व्हावयाला पाहिजे हें मी जाणत असते. तुमचें बाह्य अस्तित्व काय, कोणीहि व्यक्ति चांगल्या प्रकारें पाहूं शकेल; परंतु तें बाह्य अस्तित्व आणि मीं पाहिलेलें तुमचें आंतरिक आदर्श अस्तित्व यांच्या दरम्यान प्राणमय आणि मनोमय प्रदेश असतो. मनुष्य-प्राण्याच्या दृष्टीनें तो अत्यंत महत्त्वाचा असतो. कारण मनुष्याची आंतरिक आदर्श स्थिति जर प्रत्यक्ष स्थूल जगांत व्यक्त व्हावयाची असेल, तर त्याआधीं प्रथम तिला या मनोमय व प्राणमय पातळीवर आकार मिळाला पाहिजे. पण मीं म्हटल्याप्रमाणें, स्वतःविषयीं जें कांहीं ज्ञान आहे, ज्याविषयीं तुम्ही सक्रियरूपानें जागृत आहांत तें आणि तुमच्या जीवनाचें सत्यतत्त्व यांमध्यें फार फार मोठी दरी आहे. हा मध्यंतरींचा प्रदेश जाणून घेणें किंवा त्याच्याशीं परिचित होणें हें मला थोडेसें कठीण जातें. कारण हा प्रदेश मेघाच्छादित असतो, तें एक 'मिथ्या' जगत् असतें. याठिकाणीं

संपूर्ण असत्य आणि 'मिथ्यात्व' यांमधील फरक तुम्हीं लक्षांत ठेवला पाहिजे. असत्य म्हणजे संपूर्णतः खोटें, जें कधीं अस्तित्वांतच आलें नाहीं, किंवा जें नाहींच आहे तें. उलट 'मिथ्यात्व' म्हणजे जें खरें नाहीं, सत्य नाहीं--म्हणजेच तुमचें सत्यस्वरूप ज्यानें व्यक्त होत नाहीं, बिलकूल होत नाहीं तें. पण तरीहि त्याचविषयीं तुम्ही बाह्यतः सर्वांत अधिक जागृत असतां. फारच थोडे लोक असे असतात कीं त्यांना, आपल्याला काय व्हावयाचें आहे, काय करावयाचे आहे, आपल्या अस्तित्वाचें सत्यस्वरूप काय आहे, याचा आंतरिक बोध झालेला असतो. अशा तऱ्हेचे लोक फारसे सांपडत नाहींत. कांहींच्या बाबतींत असें होतें कीं, त्यांना या सत्याचें दर्शन होतें, पण पुनः तें आच्छादलें जातें--वीज चमकून गेल्याप्रमाणें क्षणभर त्याचें ज्ञान होतें पण पुनःश्च सर्वत्र अंधार. मला जी बाह्य चेतना अगदींच अवास्तव असत्य अशी प्रतीत होते, त्या बाह्य चेतनेची खरोखरी काय अवस्था आहे हें जाणून घेणें हें एक माझ्यासमोरचें सततचेंच कोडें असतें, सततचाच हा एक प्रश्न माझ्या पुढें असतो.

तुमच्यापैकीं प्रत्येकानें कसें असावें याविषयीं मीं माझ्यासमोर उभी केलेली आदर्श मूर्ति यामध्यें आणि तुम्हीं दैनंदिन चालविलेलें पशुसदृश जीवन यांमध्यें खरोखरी किती विरोध दिसून येतो ! तुम्हांला हा आदर्श साध्य करून घेतां यावा, हा आदर्श जीवनांत साक्षात् उतरवितां यावा म्हणून माझ्या जाणिवेचें सर्व सामर्थ्य लावून ही आदर्शमूर्ति नेहमीं अभंग ठेवण्याचा मी यत्न करते. वास्तविक तेंच तुमचें खरें स्वरूप आहे. तेंच खरें तुम्ही आहांत. तुमच्या ज्या अज्ञ, मूढ, धूर्त, अप्रामाणिक अस्तित्वाला तुम्ही 'मी' असें म्हणत असतां तें तुमचें खरेंखुरें स्वरूप नाहींच. ९ जून १९५४

CWMCE Vol 06 : Page 165

-३-

फार फार दिवसापूर्वी, जेव्हां मी पॅरिसमध्यें रहात होते, तेव्हां जवळ जवळ दररोज मी श्रीमती डी.एन्. यांच्याकडे जात असे. त्यांच्याजवळ नेहमीं नवीन नवीन विचार ऐकावयास मिळत. त्या मला एकदां म्हणाल्या, "आपण कर्माचा विचार करतां कामा नये. कर्म करणें याचा अर्थ आपली कर्मावर आसक्ति आहे. ज्यावेळीं कांहीं अमुक एक करावें अशी इच्छा आपल्याला होते, त्यावेळीं त्यावरून स्पष्ट होतें कीं, आपण अजूनहि ऐहिक गोष्टींनीं बांधले गेलेलें आहोंत."

मीं उत्तर दिलें, "नाहीं. ही तर सर्वांत सोपी गोष्ट आहे. जें जें कांहीं भूतकाळीं घडून गेलें आहे, भविष्यकाळीं घडणार आहे आणि वर्तमानकाळीं या क्षणीं अखिल विश्वांत जें काय घडत आहे तें, या सर्वांची एकसमयींच कल्पना करून पाहतांच आपल्याला ताबडतोब सहज कळून येईल कीं, आपलें कर्म म्हणजे अगदींच अत्यल्प प्रयत्न आहे; अनंत काळांतील एका क्षणाइतकीच त्याला किंमत आहे; आणि यामुळें आपल्याला स्वकर्माविषयीं आसक्ति कधींच वाटणार नाहीं." त्यावेळीं गीतावचन मला माहीत नव्हतें. म्हणून मीं माझ्या भाषेंत असें म्हटलें कीं, "कर्मफलाविषयीं अनासक्त राहून कर्म करावें." गीतेची शिकवण मला नक्की माहीत नसली तरी, त्यावेळीं जें मीं म्हटलें तें गीतेच्या उपदेशाशीं जुळणारें असेंच होते. असो. तुमचें कर्म म्हणजे कांहीं विशेष गोष्ट आहे अशा समजुतीनें नको, तर कर्म

केलेंच पाहिजे असें आहे म्हणून तुम्ही कर्म करीत जा. अर्थात् या धोरणानें राहणें ही स्थिति कधीं कधीं धोक्याची ठरणें शक्य असतें हें उघड आहे. कारण त्यामुळें तुम्ही प्रबल संकल्पशक्तीसह कर्म करण्याची इच्छा बाळगण्याऐवजीं घडत असलेल्या घटना नुसत्याच बघत राहून त्या घडतील तशा घडूं द्याल आणि हें इष्ट नाहीं.

३० नोव्हेंबर १९५५.



-४-

**प्रश्न–"मी नेहमीं तुमच्या सन्निध आहे" या म्हणण्याचा नेमका अर्थ काय ?**

"ज्यावेळीं मनांतल्या मनांत आम्ही एकादा प्रश्न सोडविण्याची खटपट करतो किंवा प्रार्थना करतो, त्यावेळीं ती ऐकणारे खरोखरी नेहमीं कोणी असते काय ? आमची दुर्बोधता आणि अपूर्णता, आमच्या आंत असलेल्या अशुभ इच्छा आणि प्रमाद असूनहि आमचें म्हणणें ऐकणारें कोणी असतें काय ? तें कोण ऐकतें ? आमच्या सन्निध असणाऱ्या तुम्ही स्वतः तें ऐकतां ? आणि त्यावेळीं तुमचें स्वरूप काय असतें ? त्यावेळीं तुम्ही तुमच्या सर्वोच्च चेतनेमध्यें दिव्य शक्तिरूपानें, योगशक्तिरूपानें वसत असतां, कीं भौतिक चेतनेमधील देह-धारी व्यक्ति–ज्याला आम्ही श्रीमाताजी म्हणतो त्या–असतां ? आमचा प्रत्येक विचार, आमची प्रत्येक कृति जाणणारी अशी कोणी प्रत्यक्ष व्यक्ति ती असते ना ? नामरूपशून्य अशी ती केवळ एक शक्ति नसते ना ? तुम्ही आमच्याबरोबर कशा आणि कोणत्या रीतीनें उपस्थित असतां हें सांगाल कां ?

**"असें म्हणतात कीं, तुमची आणि श्रीअरविन्दांची जाणीव एकरूप व अभिन्न अशी आहे; पण श्रीअरविन्दांचें एक व्यक्तिगत स्वरूप व तुमचें एक वेगळें व्यक्तिगत स्वरूप आहे काय ? आणि या दोन्हीं स्वरूपांचें आपआपलें असें वेगळें कार्य आहे काय ?**

**उत्तर**–"मी तुमच्या बरोबर असते; कारण मी 'तुम्ही' आहे आणि तुम्ही 'मी' आहांत. "मी तुमच्याबरोबर आहे" याचें अगणित अर्थ आहेत. कारण, परात्पर चेतनेच्या पातळीपासून तो थेट अत्यंत स्थूल जड-भौतिक पातळीपर्यंत सर्व भूमिकांवर, सर्व थरांवर मी तुमच्या बरोबर असते. येथें पांडीचेरीमध्यें, माझ्या जाणीवेमध्येंच तुम्ही श्वासोच्छ्वास करतां, त्याशिवाय तुम्ही श्वासोच्छ्वासच करूं शकणार नाहीं. सूक्ष्म भौतिक पातळीमध्यें अगदीं स्थूलरूपानेंहि या वातावरणांत माझी चेतना ओतप्रोत भरून राहिलेली असून, येथून दहा किलोमीटर अंतरावर–जवळ जवळ ६,७ मैल असलेल्या तळयापर्यंत ती पसरलेली आहे. याशिवाय त्यापलीकडे, स्थूलप्राणमय थरावर (Material Vital Plane)आणि त्यानंतर मानसिक पातळीवर माझी उपस्थिति अनुभवास येते आणि त्याहून उच्चतर भूमिकांवर तर माझ्या चेतनेचा सर्वत्रच अनुभव येऊं शकेल. मी जेव्हां प्रथम येथें आलें, त्यावेळीं येथून १० मैलांवर-१० किलोमिटर नव्हे तर सामुद्रिक १० मैलांवर (जवळ जवळ अकरा मैल)– मला श्रीअरविन्दांच्या वातावरणाचा अगदीं प्रत्यक्ष स्थूल स्वरूपांत अनुभव आला. हा अनुभव अगदीं अचानक आला. तें वातावरण अगदीं प्रत्यक्ष, स्पष्ट, पवित्र, उज्ज्वल आणि अत्यंत हलकें, जणुं आपल्याला वर उचलून धरणारें असें होतें.

तुम्हांला हें माहीत आहे कीं, बरेंच दिवसांपूर्वी श्रीअरविंदांनीं स्मरणवाक्य म्हणून एक संदेश आश्रमामध्यें सर्व ठिकाणीं लावावयास दिला होता.––"नेहमीं असें वर्तन करा कीं जणुं श्रीमाता तुमच्याकडे बघत आहे, कारण खरोखरीच ती नेहमींच उपस्थित आहे."–हें केवळ एक वाक्य नाहीं, नुसते शब्द नाहींत, हें एक सत्य आहे, ही खरी वस्तुस्थिति आहे.

अगदीं प्रत्यक्षरूपानें मी तुमच्याबरोबर असते आणि ज्यांना सूक्ष्म दृष्टि असते, ते मला पाहूंहि शकतात. सामान्य रूपानें माझी शक्ति नेहमींच कार्य करीत असते. तुमच्या अस्तित्वांतील मानसिक तत्त्वांना नव्या परिस्थितीमध्यें, नव्या संबंधांत, पुनः व्यवस्थित रूप प्राप्त व्हावें म्हणून ही शक्ति निरंतर उलटापालट करीत असते. तुमच्या स्वभावामधील कोणत्या गोष्टी बदलावयास पाहिजेत, विकसित करावयास पाहिजेत अथवा टाकून दिल्या पाहिजेत, हें तुम्हांला कळावें म्हणून तुमच्या स्वभावाच्या निरनिराळ्या पैलूंचे तुमच्यासमोर ती जणुं स्पष्टीकरण करीत असतें.

परंतु याशिवायहि, तुमच्यामध्यें आणि माझ्यामध्यें––म्हणजेच श्रीअरविन्दांच्या आणि माझ्या शिकवणीकडे जे लोक वळलेले आहेत त्यांच्यामध्यें व माझ्यामध्यें–एक विशेष प्रकारचें वैयक्तिक नातें आहे. अर्थात् या ठिकाणीं हें तर गृहीतच आहे कीं, येथें अंतराचा कांहीं प्रश्न नाहीं. तुम्ही फ्रान्समध्यें असा, जगाच्या दुसऱ्या टोंकाला असा किंवा पांडिचेरीमध्यें असा, हा वैयक्तिक संबंध नेहमींच खरा आणि जागता असतो; आणि ज्या ज्या वेळीं मला हांक येते, त्या प्रत्येक वेळीं मला जाणून घ्यावें लागतें. त्यामुळें कांहीं शक्ति, कांहीं प्रेरणा, अंतःस्फूर्ति, संरक्षण किंवा दुसरी कांहीं गोष्ट मी पाठवूं शकते. एकदम अचानकपणें मला एक प्रकारचा संदेश येतो आणि मी आवश्यक तें कार्य करून टाकते. अशा प्रकारचे संदेश माझ्याकडे कोणत्याहि क्षणीं येऊन पोहोंचतात हें उघडच आहे. तुम्ही अनेकवेळां पाहिलेंच असेल कीं, एकादें वाक्य उच्चारतांना किंवा काम करतांना मध्येंच मी एकदम थांबते. त्याचें कारण, असा कांहींतरी संदेश, असें कांहीं तरी काम मला आलेलें असतें; आणि म्हणून मी त्याक्षणीं त्यावर एकाग्र झालेली असते.

ज्या लोकांना मी अनुयायी, शिष्य म्हणून स्वीकारलेलें आहे, ज्यांना मी "होय" म्हणून म्हटलेलें आहे, त्यांच्या बाबतींत या वैयक्तिक संबंधाहून अधिक कांहीं तरी असतें, त्यांच्या सन्निध माझी एक अंश-विभूति सतत उपस्थित असते. वेळ पडेल तेव्हां, ही अंश-विभूति मला सूचना देते; आणि जें काय घडत असेल त्याविषयीं मला वार्ता देते. खरोखर, एकसारख्या मी सूचना ग्रहण करीत असते. एवढेंच कीं, माझ्या बाह्य कार्यकारी स्मृतीमध्यें त्या सर्वांचीच नोंद होत नसते; तसें झालें तर तेथें त्यांचा पूरच लोटेल; गोंधळ-गर्दी होऊन जाईल. भौतिक चेतना ही एकाद्या चाळणीप्रमाणें कार्य करीत असते. एका सूक्ष्म जगतामध्यें त्या पातळीवर घटनांची नोंद होते; त्या घटना प्रच्छन्न अवस्थेंत पडून राहिलेल्या असतात. संगीताच्या ध्वनिमुद्रिका न वाजवितां पडून रहाव्या तसें त्यांचें स्वरूप असतें. माझ्या भौतिक चेतनेमध्यें मला एकाद्या घटनचें ज्ञान व्हावें अशी जेव्हां मला गरज वाटतें, त्यावेळीं सूक्ष्म भौतिक जगताशीं मी संबंध जोडते; आणि ती ध्वनिमुद्रिका जणुं वाजूं लागते. प्रत्यक्ष घटना कशा चाललेल्या आहेत, त्यांचा उत्तरोत्तर कसा विकास होत आहे हें मी यथार्थरीतीनें पाहूं शकते.

त्याचबरोबर, समजा, कांहीं कारणानें तुम्ही मला पत्र लिहून माझी मदत मागितलीत आणि त्याला उत्तर म्हणून " मी तुमच्याबरोबर आहे" असें मी सांगितलें तर त्याचा अर्थ असा कीं, तुमच्याशीं असलेला माझा संबंध सक्रिय झालेला आहे; आणि कांहीं काळपर्यंत-जेवढा आवश्यक असेल तितका काळ तुम्ही माझ्या भौतिक सक्रिय चेतनेमध्यें आलेलें आहांत.

तुमच्यांतील व माझ्यांतील हा संबंध, हें नातें अतूट असें आहे, अभंग राहणारें आहे. ज्यांनीं फार फार पूर्वींच आश्रम सोडून दिलेला आहे, कांहींनीं तर विद्रोह करून सोडून दिलेला आहे, त्यांच्याविषयीं सुद्धां मी विचारपूस करीत असते; त्यांच्या बाबतींत सुद्धां मी लक्ष घालतें. मी तुम्हां लोकांचा कधींच परित्याग करीत नाहीं.

खरें म्हटलें तर, तुमची प्रत्येकाचीच जबाबदारी मी स्वतःवर घेतलेली आहे; माझ्या आयुष्यांत ज्यांची माझ्याशीं केवळ एक क्षणभरच भेट झालेली असेल त्यांची सुद्धां !

आतां, एक गोष्ट लक्षांत ठेवा. श्रीअरविन्दांची व माझी चेतना एकच आहे, अभिन्न आहे; आम्ही एकच आणि अभिन्न व्यक्ति आहोंत. फक्त ही एकच असलेली शक्ति किंवा उपस्थिति, हें एकच असलेलें अस्तित्व जेव्हां तुमच्या वैयक्तिक जाणीवेमध्यें प्रवेश करतें, त्यावेळीं तें एक विशिष्ट आकार, बाह्य रूप धारण करतें; अर्थात् तुमचा स्वभाव, कल, तुमची आकांक्षा, तुम्हांस असलेली आवश्यकता, तुमच्या स्वभावाचें विशिष्ट वळण यांनुसार हें बाह्य रूप, हा आकार बदलतो. तुमची वैयक्तिक चेतना ही एकाद्या चाळणीप्रमाणें असते; किंवा मी असें म्हणूं शकेन कीं, ती एकाद्या निर्देशक सुईप्रमाणें-कांटयाप्रमाणें असते; ती निवड करीत असते. अनंत दिव्य संभाव्यतांपैकीं एकादी निवडून ती निश्चित करीत असतें. वास्तविक प्रत्येक व्यक्तीनें भगवंताकडून जी गोष्ट मागितली असेल, ज्या गोष्टीची अपेक्षा केली असेल, तीच नेमकी गोष्ट तो प्रत्येकाला देत असतो. तुमच्यापासून परमेश्वर फार फार दूर आहे व तो कठोर आहे असा तुमचा विश्वास असेल, तर तो खरोखरच फार दूर व कठोर राहील. कारण भगवंताच्या क्रोधाचा अनुभव येणें हेंच तुमच्या अंतिम कल्याणाच्या दृष्टीनें आवश्यक असेल असा त्याचा अर्थ. कालीच्या उपासकांसाठीं तो कालीचें रूप घेईल, भक्तांसाठीं आनंदमय होईल. ज्ञान-पिपासूंसाठीं तो सर्व-ज्ञानमय होईल, तर मायावाद्यांसाठीं परात्पर निर्गुण निर्व्यक्तिक ब्रह्म; अनीश्वरवाद्यांसाठीं तो अनीश्वर होईल तर प्रेमींच्यासाठीं प्रेमरूप होईल. प्रत्येक क्षणीं, प्रत्येक कृतीमध्यें मार्गदर्शन करणारा तो अंतस्थ मार्गदर्शक आहे अशी ज्या लोकांची भावना असेल, त्यांच्यासाठीं तो घनिष्ठ आप्त होईल; सर्वदा विश्वासपात्र आणि सदा सहाय्यतत्पर असा मित्र बनेल. तुमचा जर असा विश्वास असेल कीं, तो तुम्हांला निष्कलंक करील, तर खरोखरीच अविश्रांतपणें तो तुमचे दोष, तुमचे प्रमाद काढून टाकील; आणि क्षणोक्षणीं त्याची असीम कृपा तुमच्या अनुभवास येईल. तुमच्या खोल खोल अभीप्सेमध्यें तुम्ही भगवंताविषयीं जशी अपेक्षा करतां तसाच तो खरोखरी असतो.

जेथून सर्व कांहीं घटना केवळ एका दृष्टिक्षेपांत जाणून घेतां येतील, मानव आणि भगवंत यांच्यामधील अगणित संबंधांचें जेथें ज्ञान होईल, अशा चेतनेमध्यें तुम्ही प्रवेश केलांत म्हणजे तर हें सर्व कांहीं—त्याच्या अंगोपांगांसह सर्वकांहीं—किती अद्भुत आहे तें तुम्हांला दिसेल. मानवतेच्या इतिहासाकडे दृष्टिक्षेप टाकून तुम्हांला हें सहज पाहतां येईल कीं,

मानवाचें ज्ञान, त्यानें भगवंताकडून केलेल्या आशा-आकांक्षा, त्याच्या कल्पना-वासना, त्यानें रंगविलेलीं स्वप्नें, या सर्वांना मान देऊन भगवंत कसा विकसित होत आला आहे; जडवादी लोकांसाठीं तो कसा जडमय बनला आणि त्याचप्रमाणें जसजशी मानवी जाणीव विशाल होत गेली तसतसा परमेश्वरहि कसा दिवसेंदिवस वाढत गेला, अधिक समीप, अधिक ज्योतिरूप होत गेला. प्रत्येक व्यक्ति निवड करण्यास स्वतंत्र आहे. आजपर्यंतच्या इतिहासांत, परमेश्वर आणि मानव यांच्या संबंधांची अनंत-विविधता आणि तिची परिपूर्णता हें एक अवर्णनीय आश्चर्य आहे ! आणि हें सर्व एकसमयावच्छेदें पाहिलें तर, भगवंताच्या अखिल अभिव्यक्तीच्या मानानें तें केवळ एकाद्या क्षणांत घडल्यासारखें, एका क्षणाचें कार्य आहे.

भगवान् तुमच्या अभीप्सेनुसार तुमच्याबरोबर असतो. अर्थातच याचा अर्थ असा मात्र नव्हे कीं, तुमच्या बाह्य प्रकृतीच्या लहरीप्रमाणें तो बदलत रहातो,—या ठिकाणीं तुमच्या अस्तित्वाच्या सारतत्त्वाविषयीं, सत्य-तत्त्वाविषयीं मी बोलत आहे; आणि तरीहि कधीं कधीं तुमच्या बाह्य आकांक्षांना साजेसें रूप देखील परमेश्वर घेतो; विरह व मीलन, अत्यानंद आणि निराशा, अशा द्वंद्वांच्या स्थितींत आलटून पालटून तुम्ही राहिलांत तर तुमच्या धारणेनुसार भगवंतहि तुमच्यापासून कांहींकाळ दूर जाईल, आणि पुनश्च येऊन भेटेल. अशा रीतीनें वृत्ति ही अत्यंत महत्त्वाची आहे; बाह्यवृत्तीहि महत्त्वाची आहे. श्रद्धा ही गोष्ट किती महत्त्वाची आहे, ती कशी आश्चर्यजनक वस्तु आहे, आश्चर्याची खाण आहे हें लोक जाणत नाहींत. आपण प्रत्येक क्षणीं उच्च उच्चतर जावें, भगवंताकडे ओढलें जावें अशी इच्छा तुम्ही सतत ठेवलीत तर भगवंतहि तुम्हांला उचलून घ्यावयास येईल आणि मग तो तुमच्या जवळ, अगदीं निकट, नेहमींच तुमच्या सन्निध राहील.

CWMCE : Vol 13 : Page75-78

-५-

## खरा एकान्त

हे तर निश्चित आहे कीं, एकान्तीं भोजन करणें, एकान्तांत झोंपणें, एकटेंच फिरावयास जाणें, मार्ग चालणें आणि वनांत एकाकी राहणें या गोष्टी आत्मस्वातंत्र्य प्राप्त करून घेण्यास मुळींच पुरेशा नाहींत.

आपणांस हें साधारणतः माहीत आहेच कीं, वनांत जाऊन एकान्त सेवन करणाऱ्या बहुतेकांची भोंवतालच्या वनचरांशीं आणि झाडाझुडपांशीं मैत्री जडते. एकान्तवासानें तुम्हांला आंतरिक चिंतन करण्याची किंवा सर्वोच्च सत्याशीं तादात्म्य पावून राहण्याची शक्ति मिळते असें मुळींच नाहीं. परिस्थितीच्या दडपणामुळें किंवा दुसरा कांहींच उद्योग नसल्यामुळें हें चिंतन कदाचित् तुम्हांला अधिक सुलभ वाटत असेल; परंतु मला हें पटत नाहीं. कारण मनुष्य हा केव्हांहि कांहींतरी उद्योग शोधून काढत असतो. मला जो काय जीवनांत अनुभव आला आहे, त्यावरून मात्र असें वाटतें कीं, अडचणींमध्यें असतांनाहि जर तुमचें आपल्या प्रकृतीवर स्वामित्व असेल, भगवत्कृपेनें आपणांस जी कांहीं परिस्थिति, जें कांहीं वातावरण मिळालेलें आहे, त्यामध्यें राहूनहि जर निरंतर उपस्थित असलेल्या सनातन परमेश्वरासह अंतरंगामध्यें एकटेंच राहण्याचा तुम्ही प्रयत्न करीत असलांत, तर त्यायोगें जी

अनुभूति, जो साक्षात्कार तुम्हांला होईल तो अनंतपटीनें अधिक खोल आणि अधिक स्थायी स्वरूपाचा असेल.

अडचणींवर विजय मिळविण्याच्या उद्देशानें त्यांच्यापासून पळून जाणें हा खरा उपाय नव्हे. पण तो मार्ग फार आकर्षक आहे खरा. आध्यात्मिक जीवन जगण्याची तीव्र इच्छा असणाऱ्यांना अंतरंगांमधून जणुं कोणी म्हणत असतें, "आहा! एखाद्या वृक्षाखालीं शांतपणें एकटें बसावयाचें, सतत ध्यानमग्न रहावयाचें, कांहीं कोणाशीं बोलण्याची गरज नाहीं, कामाची निकड नाहीं, कसलाहि मोह नाहीं, किती सुंदर असेल ही अवस्था!" पण त्यांना असें कां वाटतें? त्याचें कारण हें कीं, या विषयाबद्दल त्यांची तशी अत्यंत दृढ भावना होऊन गेलेली असते. परंतु खरें पाहतां ती भ्रामक असते. ध्यान केलेंच पाहिजे, त्याशिवाय चालणार नाहीं, त्याशिवाय राहतांच येणार नाहीं, अशा अनिवार्य स्वरूपांत जेव्हां अचानकपणें ध्यानाची अवस्था तुम्हांस प्राप्त होते, जणुं ध्यान तुमची पकड घेतें, तुम्हांला पकडतें, त्यावेळीं होणारें ध्यान 'सर्वोत्तम ध्यान' होय. अशावेळीं ध्यान केल्याशिवाय, मनाची एकाग्रता केल्याशिवाय, चिंतन केल्याशिवाय, वस्तूंच्या वरवरच्या भासमान् रूपांपलीकडे गेल्याशिवाय तुम्हांला राहवतच नाहीं; पण अशी ही अवस्था केवळ वनामधील एकांतांतच येते असें नाहीं; तर ज्यावेळीं तुमचें अंतरंग परिपक्व होतें, ज्यावेळीं नियोजित क्षण येतो, खरोखरीची गरज, भूक निर्माण होते, किंवा ज्यावेळीं तुमच्यावर भगवत्कृपेचा वर्षाव होतो तेव्हांच अशी अवस्था येते.

माझें जें काय निरीक्षण आहे, मला जें काय दिसत आहे, त्यावरून हें स्पष्ट होत आहे कीं, मानवजातीनें निश्चित विकास करून घेतलेला असून आतां खरा विजय प्रत्यक्ष या जीवनांतच मिळवावयाचा आहे. भोंवतालच्या सर्व परिस्थितीमध्यें राहूनच अनंत आणि सनातन तत्त्वाबरोबर एकांतांत, एकटें कसें राहावयाचें हें तुम्हीं शिकलें पाहिंजे, हें तुम्हांला कळलें पाहिजे. कोणत्याहि तऱ्हेचा बाह्य उद्योग करीत असतांनाहि, सर्वोच्च सत्तेला आपले 'सांगाती' करून स्वतंत्रतेनें, मुक्त अवस्थेंत कसें राहावयाचें हें तुम्हीं जाणलें पाहिजे. तोच खरा विजय आहे.

—श्रीमाताजी.

CWMCE : Vol 03 : Page 275-276

---

प्राणाधिष्ठित अशी ही चुकीची भावना आहे— शरीरधारणेसाठीं एक आवश्यक गोष्ट म्हणून अन्नाचा स्वीकार केला पाहिजे.

जे कोणी नियमितपणें अन्न व झोंप घेत नाहींत त्यांची मज्जासंस्था दुबळी होऊन ते साधनेंत सुद्धां छांदिष्ट व विकृत बनतात. २६-१२-१९३३.

—श्रीअरविन्द.

# मातृवाणी

(मागील अंकावरून पुढें)

**"पण कधीं कधीं इच्छिलेली गोष्टहि परमेश्वर देत नाहीं कां ?"**

"निश्चित देतो. एका तरुणाच्या मनांत एकदां योग आचरण करण्याचें आलें. पण त्याचे वडील क्षुद्र मनाचे व कठीण हृदयाचे होते. ते त्याला अतिशय त्रास देत आणि योगाचरण करूं देत नसत. या वडिलांच्या त्रासापासून सोडवणुक करून घ्यावी अशी त्याची उत्कट इच्छा होती. पुढें लवकरच त्याचे वडील आजारी पडले. दुखणें विकोपाला गेलें; मृत्यु समीप येऊन ठेपला. त्याबरोबर मुलाच्या स्वभावांतील दुसरा भाग जागा झाला. ओढवलेल्या दुर्घटनेचा तो शोक करूं लागला, "काय हें दुर्दैव! वडिलांना हें जिवावरचें दुखणें. मोठाच दुःखद प्रसंग आहे हा. काय करावें ?" असा त्यानें शोक आरंभिला. वडील दुखण्यांतून उठले. मुलाला आनंद वाटला आणि पुनरपि त्यानें योगास सुरुवात केली. पण त्याबरोबर पिताजींनीहि त्याला पहिल्याहून दुप्पट जोरानें विरोध करण्यास नि सतावून सोडण्यास आरंभ केला. मुलगा दारूण निराशेनें म्हणूं लागला: "आतां तर, आजवर केला नाहीं इतका विरोध वडील पुनः करूं लागले !" यांतलें सार असें कीं, आपल्याला नेमकें काय हवें आहे तें आपल्याला अचूक जाणतां आलें पाहिजे.

भगवत्कृपेबरोबर नेहमींच संपूर्ण स्थिरता आणि शान्ति येते. पण कांहीं भक्तवर्गाच्या बाबतींत सर्वसाधारणपणें एक निराळेंच दृश्य दृष्टीस पडतें हें खरें आहे. ते नाचतात, आक्रोश करतात, हंसतात, गातात, आणि हें सारें ते भक्तीच्या आवेशांत करतात असें ते म्हणतात. पण वस्तुतः हे लोक दिव्यतेमध्यें, भगवत्सान्निध्यांत निवास करीत नाहींत, तर प्राणमय जगतांत, वासना-भावनांच्या क्षेत्रांतच ( Vital world ) प्राधान्येंकरून ते वावरत असतात.

"श्रीरामकृष्ण परमहंसांच्या जीवनांतहि या प्रकारचे भावावेशाचे कालखंड येत आणि त्यावेळीं ते बाहू उंचावून गात, नाचत व इकडे तिकडे हिंडत" असें तुम्ही म्हणतां; पण या बाबतींत सत्य असें आहे—साधकाच्या ठिकाणची आंतरिक अनुभूति निर्दोष आणि परिपूर्ण असू शकते. त्यायोगें त्याच्या ठिकाणीं शक्तींचा स्वीकार करण्याची कांहीं एक स्थिति येते; पण त्याच्या बाह्य स्वभावांत जर कां दुर्बलता किंवा अशुद्धि असेल, त्याचें स्वभाव-परिर्वतन झालेलें नसेल, तर त्या शक्ति त्याच्या ठिकाणी उत्कट भावनात्मक प्रक्षोभ निर्माण करतात. ज्यावेळीं अशा रीतीनें साधकाचा बाह्य स्वभाव त्याच्या आंतरिक जीवनाला प्रतिकार करीत असतो किंवा ज्यावेळीं त्याच्या बाह्य स्वभावास समग्र आनंद पूर्णत्वानें धारण करतां येत नाहीं, त्यावेळीं भक्तीच्या आविष्कारामध्यें या प्रकारचा गोंधळ नि अराजकता आढळून येतेच.

तुमचें शरीर सुदृढ असलें पाहिजे; तुमची मज्जासंस्थाहि सुदृढ हवी. तुमच्या बाह्य स्वभावांत सुस्थिर असा समत्वभाव दृढ झालेला असला पाहिजे. असा मजबूत पाया घातलेला असला म्हणजे भावनांचा अथांग सागरहि तुम्हांस शांतपणें अंतरीं सामावून घेतां

येईल; आणि मग आक्रोशाच्या रूपानें भावना बाहेर प्रकट कराव्या लागणार नाहींत. मात्र याचा अर्थ असा नव्हे कीं, तुम्हांला भावना प्रकटच करतां येणार नाहींत; उलट भावनांच्या आविष्कारांत एक निराळेंच सौंदर्य व सुसंवाद प्रतीत होईल. भावनावेगानें अश्रु ढाळणें, आक्रोश करणें अथवा नृत्य करणें हें नेहमींच एक दुर्बलतेचें लक्षण आहे. मग ती दुर्बलता भावनांची असो, मनाची असो किंवा शरीराची असो. कारण या कोठल्याहि भूमिकेवर ज्या कांहीं कृती होत असतात, त्या स्वसमाधानार्थ, आत्मतुष्टीसाठीं होत असतात. जे कोणी भावनावेगानें नाचतात, उड्या मारतात, किंचाळतात त्यांची कांहीं कारणानें कां होईना अशी भावना असते कीं, आपला भावावेश हा कांहीं असाधारण प्रकारचा आहे. त्यांच्या ठिकाणची प्राणाधिष्ठित प्रकृति अशा प्रकारच्या अनुभूतींत विशेष रस घेत असते.

भगवत्‌शक्तीच्या अवतरणाचा भार सोसायचा असेल तर तुम्हीं अत्यंत बळकट आणि शक्तिशाली असलें पाहिजे. अन्यथा तुमचा चक्काचूर होऊन जाईल; निभाव मुळींच लागावयाचा नाहीं. "अजून परमेश्वर कां आला नाहीं ?" असें कांहीं लोक म्हणतात. अर्थातच तुमची तयारी नाहीं म्हणून. ईशशक्तीच्या एका बिंदूनेंहि जर तुम्ही गायला, नाचायला आणि किंचाळायला लागलांत, तर मग सारा शक्तिसागरच जर खालीं अवतरला तर काय होईल ?

म्हणूनच ज्यांच्या शरीर, प्राण व मन यांमध्यें भगवच्छक्तीच्या अवतरणास बळकट, सुस्थिर व व्यापक असा आधार तयार झालेला नाहीं, त्यांना आम्ही बजावून सांगत असतो कीं, 'खेंचूं नका'; म्हणजेच 'भगवन्ताच्या शक्तींना आपल्यामध्यें खेंचून आणण्याचा प्रयत्न नका करूं; तर शांत व स्थिर वृत्ति राखून प्रतीक्षा करा.' कारण अशा प्रकारच्या साधकांना भगवच्छक्तीचें अवतरण पेलणार नाहीं. परंतु ज्यांच्या ठिकाणीं ईशशक्तीच्या अवतरणास योग्य असा आधार व पाया-भरणी झाली असेल, त्यांना उलट आम्ही असें सांगतो कीं, "अभीप्सा करा, आणि ओढून घ्या." कारण भगवंताच्या शक्ती स्वीकारण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं असतें आणि भगवच्छक्तीच्या अवतरणानें ते विचलित होत नाहींत; त्यांच्यांत कसलीच उलथापालथ होत नाहीं.

**"परमेश्वराकडे वळलेल्या लोकांपैकीं कांहींच्या बाबतींत असें घडून येतें कीं, त्यांचा सर्व भौतिक आधार अथवा त्यांना प्रिय असलेल्या सर्व गोष्टी त्यांच्यापासून हिरावून घेतल्या जातात; इतकेंच नव्हें तर त्यांचें एकाद्या व्यक्तीवर प्रेम असेल तर तिलाहि त्यांना मुकावें लागतें. या संबंधीं काय ?"**

सर्वांच्या बाबतींत असें घडून येत नाहीं. ज्यांना भगवंताची हांक आलेली असते त्यांच्या बाबतींत असें घडून येत असतें.

आध्यात्मिक जीवनासंबंधीं पाश्चात्य आणि पौर्वात्य लोकांमध्यें जो कांहीं भेद दिसून येतो तो अंतःपुरुष अथवा आंतर प्रकृति यांविषयीं नाहीं; कारण तो तर अविकार्य व नित्य आहे. भेद असतो तो मनाच्या संवयी, बाह्य आविष्कार-पद्धती किंवा प्रतिपादनाच्या रीतीं-मध्यें; कारण या गोष्टी, शिक्षण, भोंवतालची परिस्थिति आणि इतर बाह्य घटना यांवर

अवलंबून असतात. पाश्चिमात्य किंवा पौर्वात्य कोणीहि असो, त्यांच्या ठिकाणच्या गूढ अनुभूतींच्या बाबतींत ते समरूपच असतात. त्यांच्या विचार करण्याच्या पद्धतींत मात्र अंतर असतें. उदाहरणार्थ, अंतःकरणपूर्वकता हा गुण असा आहे कीं, तो जगांत सर्वत्र सारखाच असणार. ज्यांना तळमळ वाटते अशा व्यक्ती कोणत्याहि राष्ट्रांतील असोत; त्यांची तळ-मळ एकाच जातीची असणार. मात्र तळमळीनें धारण केलेलीं रूपें मात्र वेगवेगळीं असून निरनिराळ्या समाजांत निरनिराळ्या रीतीनें तीं कार्य करतात. हृदय मात्र सर्वत्र सारखेंच असतें. हृदय ही मनापेक्षां बरीच वास्तव स्वरूपाची खरी अशी वस्तु आहे. दिसून येणारे भेद हे पृष्ठभागावरील होत. तेथें तुम्ही पुरेसे खोल गेलांत, तर तत्क्षणीं तुम्हांला असें कांहीं सांपडेल, जें सर्वांच्या ठिकाणीं एकच आहे. भगवंताचे ठिकाणीं सारे एक होऊन जातात. जगांत सूर्य हें भगवंताचें प्रतीक आहे. ढगांमुळें त्याचें दृश्यरूप बदलूं शकेल; पण ढग गेल्यावर त्याच सूर्याचें सर्वांना सर्वत्र आणि सदासर्वदा दर्शन होईल.

एकाद्या व्यक्तीशीं जर तुम्हांला एकात्मता अनुभवतां येत नसेल तर त्याचा अर्थ उघड आहे; अनुभूतीच्या जलाशयांत पुरेशी खोल बुडी तुम्हीं मारलेली नाहींत.

*

**"दृश्यें म्हणजे आंतरिक दृष्टीस दिसणारीं दृष्यें (Vision) पाहणें, हें मोठ्या आध्यात्मिकतेचें चिह्न आहे अशी एक सर्वसाधारण कल्पना प्रचलित आहे. तींत कितपत तथ्य आहे ?"**

नाहीं, तसें असेलच असें नाहीं. शिवाय दृश्यें दिसणें ही एक गोष्ट, पण जें दिसलें असेल तें समजणें किंवा त्याचा अर्थ लावणें ही गोष्ट अगदींच निराळी आहे; आणि ती बरीच कठीण आहे. सामान्यपणें असें दिसून येतें कीं, जे कोणी दृश्यें पाहतात ते फसतात. कारण आपल्या वासना, आशा व पूर्वग्रह यांना धरून, पाहिलेल्या दृश्यांचा अर्थ लावण्याची त्यांची इच्छा असते. शिवाय अशीं दृश्यें अनेक भिन्नभिन्न भूमिकांवर दिसूं शकतात. कांहीं मान-सिक भूमिकेवरचीं, कांहीं प्राणमय भूमिकेवरचीं दृश्यें असतात किंवा भौतिक जगताच्या अगदीं समीप असलेल्या अशा पातळीवरहि दृश्यें दिसतात. या तिसऱ्या प्रकारचीं दृश्यें, अशा आकारांनीं व प्रतीकांनीं युक्त असतात कीं, अगदीं हुबेहुब स्थूल भौतिक दृश्यासारखीं तीं स्पष्ट, वास्तव व स्पर्शनीय असतात; आणि त्यांचा अर्थ लावण्याची रीत जर तुम्हांला समजली तर लोकांची आंतरिक स्थिति आणि परिस्थिति यांसंबंधीं अगदीं बिनचूक सूचना तुम्हांला मिळूं शकतील.

हें एक उदाहरण पहा. पुढील दृश्य एका व्यक्तीला प्रत्यक्ष दिसलें होतें. टेकडीच्या सुळक्यासारख्या उभ्या-चढणीवर एक मार्ग आहे. सूर्याच्या लख्ख प्रकाशांत टेकडी न्हाऊन निघत आहे. सहा मजबूत घोड्यांचा एक अवजड रथ मोठ्या कष्टानें मार्ग आक्रमत चालला आहे. तो सावकाशच पण एकसारख्या गतीनें चाललेला आहे. इतक्यांत एक मनुष्य येतो. एकंदर परिस्थितीचें अवलोकन करतो आणि रथाच्या मागील बाजूस जाऊन रथ चढणीच्या मार्गावर ढकलावयास लागतो, तसा प्रयत्न करूं लागतो. नंतर कोणी एक जाणती व्यक्ति तेथें येते आणि त्याला म्हणते, "उगाच व्यर्थ श्रम कां करतोस ? तुझ्या श्रमांचा कांहीं परिणाम होऊं शकेल असें कां तुला वाटतें ? तुला तें करणें अगदीं अशक्य

आहे. त्या घोड्यांना देखील तें किती कठीण जात आहे!"

आतां, वरील दृश्यांतील 'सहा घोड्यांच्या' रूपकांतच त्याचा अर्थ लावण्याची किल्ली आहे. 'अश्व' हें शक्तीचें प्रतीक आहे आणि 'सहा' या संख्येनें दिव्यसृष्टि सूचित होते; म्हणून 'सहा घोडे' म्हणजे 'दिव्यसृष्टीच्या सहा शक्ती'. रथ हें आत्मसाक्षात्काराचें प्रतीक आहे; ज्याचा साक्षात्कार करून घ्यावयाचा आहे, जें प्राप्तव्य आहे, दिव्यज्योतीचें वास्तव्य असलेल्या उत्तुंग ठिकाणीं जें नेऊन सुपूर्त करावयाचें आहे त्याचें प्रतीक रथ हें आहे. सृजन करणाऱ्या या सहा शक्ती जरी दिव्य असल्या तरी, त्यांनाहि आत्म-साक्षात्कार पूर्ण सिद्ध करण्याचें कार्य महाप्रयासाचे आहे. कारण घोर प्रतिकारांच्या आणि प्रकृतीच्या साऱ्या अधोगामी आकर्षणांच्या विरुद्ध जाऊन त्यांना काम करावयाचें असतें. मग येऊन ठाकतो अहंमन्य नि अज्ञानी मानवप्राणी. त्याच्या मनाच्या शक्ती किती अत्यल्प; पण त्याला वाटतें कीं, आपण कोणीतरी समर्थ आहोंत आणि याबाबत आपल्याला कांहीं हातभार लावतां येईल. पण त्याला करतां येण्याजोगी उत्तम गोष्ट कोणती असेल तर ती म्हणजे गाडींत पाऊल टाकावयाचें आणि आरामांत बसून घोडे जसे ओढून नेतील तसें त्यांना नेऊं द्यावयाचें.

स्वप्नांची बाब अगदींच निराळी असते. प्रत्येकाची स्वप्न-सृष्टि विशिष्ट नि वेगळी असल्यामुळें स्वप्नांचा अर्थ लावणें वरील पेक्षांहि कठीण असतें. अर्थात् कांहीं कांहीं स्वप्नांना विशेष अर्थहि असत नाहीं; आपल्या जाणीवेच्या अगदीं वरवरच्या भौतिक थराशीं तीं संबंधित असतात किंवा तुटक विचार, केव्हांतरी कसेतरी उमटलेले संस्कार, यंत्रवत् प्रतिक्रिया, प्रतिबिंबरूप क्रिया-कृती (Reflex activities) यांचीं परिणामरूप, अशीं तीं स्वप्नें असतात. अशा स्वप्नांना नियमित किंवा सुसंबद्ध असें कांहींहि रूप, आकार वा अर्थ नसून तीं स्मरणांतहि राहत नाहींत. आपल्या जाणीवेंत त्यांचा मागमूसहि उरत नाहीं. पण यापेक्षां कांहींशा खोलवर थरांतून उद्‌भवणारीं स्वप्नेंहि संदिग्ध असतात, कारण तीं विशेषपणें वैयक्तिक असतात—म्हणजे, व्यक्तीचे अनुभव आणि स्वभाव-वैचित्र्यें यांवरच अशा स्वप्नांचें रूप बव्हंशीं अवलंबून असतें. आंतरिक दृश्यें वा दृष्टांतहि (Visions) प्रतीकात्मक असतात आणि हीं प्रतीकें सर्वत्र सारखींच प्रचलित असतात असें नाहीं. वंश-परंपरा-धर्म यांनुसार प्रतीकें बदलतात. एखादें प्रतीक विशेषपणें ख्रिश्चन असेल तर एखादें विशेषतः हिंदू असेल; एखादें साऱ्या पौर्वात्य देशांत आढळेल तर एकादें केवळ पाश्चिमात्य देशांतच मान्यता पावलेलें असेल. उलट, स्वप्नें मात्र निखालसपणें वैयक्तिकच असतात. दैनंदिन घटना आणि उमटणारें संस्कार यांवर तीं अवलंबून असतात. म्हणून एकाचें स्वप्न दुसऱ्यानें स्पष्ट करणें किंवा त्याचा अर्थ लावणें अति अवघड. कोणतीहि एक व्यक्ति दुसऱ्या कोणत्याहि व्यक्तीस अज्ञात असल्यासारखींच असते. तरी पण ज्याला त्याला आपल्या स्वतःच्या स्वप्नांचा अभ्यास करतां येईल. त्यांची उकल करतां येईल. त्यांचा अर्थ हुडकून काढतां येईल.

आतां स्वप्नें आणि स्वप्नसृष्टि या बाबतींत कसें वागावें तें पाहूं या. प्रथमतः जाणीव करून घ्या;—आपल्या स्वप्नांची जाणीव करून घ्या. तुमचीं स्वप्नें आणि जागृत जीवनांतील घडामोडी यांमधील संबंधांचें निरीक्षण करा. जर तुम्हांला रात्रीं पडलेलीं स्वप्नें आठवतील तर तुमच्या दिवसाच्या स्थितीचा संबंध पुष्कळदां तुमच्या रात्रींच्या स्थितीशीं होता असें तुम्हांस

आढळून येईल. झोपेंत तुमच्या मनाच्या किंवा भावनांच्या किंवा दुसऱ्या कोणत्यातरी पातळीवर कांहीं ना कांहीं क्रिया नित्य घडत असतात. अशारीतीनें तिथें जें घडत असतें त्याचा तुमच्या जागृत अवस्थेवर अंमल चालतो. उदाहरणार्थ, कांहींना पूर्णत्व संपादन करण्याची अतीव आतुरता वाटत असते आणि त्या दिशेनें दिवसा त्यांचे जोरानें प्रयत्न चालू असतात. पण ते झोपीं जातात आणि दुसऱ्या दिवशीं उठून पाहतात तों आदल्या दिवशींच्या प्रयत्नांच्या परिणामांचा मागमूसहि राहिलेला नसतो. मग त्यांना पुनः त्याच चक्रांतून जावें लागतें. याचा अर्थ एवढाच कीं, दिवसभराच्या प्रयत्नांनीं जें साध्य झालें होतें तें त्यांच्या वरवरच्या किंवा जागृत भागापुरतेंच राहिलें होतें आणि अधिक खोल वा सुप्त अशा भागांना त्याचा स्पर्शहि झालेला नव्हता; झोपेंत तुम्ही या सुप्त भागांच्या तावडींत सांपडलांत आणि दिवसभर जागृत अवस्थेंत परिश्रमपूर्वक ज्याची उभारणी केलीत तें सारें भुईसपाट करून टाकण्यांत आलें.

जागृत रहा. केवळ दिवसाच्या घटनांविषयीं नव्हे, तर रात्रींविषयींहि जागृत रहा. प्रथम त्याविषयीं जाणीव प्राप्त करून घ्यावयास हवी; मग संयम. तुमच्यांपैकीं ज्यांना स्वप्नें आठवतात त्यांना असा एक अनुभव आलेला असतो, येण्याचा संभव असतो कीं, स्वप्न पाहतांनाहि, 'आपण स्वप्न पहात आहों' हें तुम्ही जाणत असतां. बाह्य स्थूल भौतिक जगतांतील ही अनुभूति नव्हे, हें तुम्ही त्यावेळींहि जाणत असतां. अशा रीतीनें तुम्हाला एकदां कां जाणीव झाली तर बाह्य जगाशीं तुम्ही जसें वागतां तसेंच स्वप्न जगतांतहि तुम्हांला वागतां येईल. स्वप्न पहात असतांना केवळ जाणीवपूर्वक इच्छाशक्तीचा उपयोग करून तुम्हांला स्वप्नांचा ओघ बदलून टाकतां येईल.

अशा रीतीनें तुम्ही जसजसे अधिकाधिक जागृत होत जाल, तसतसा रात्रींच्या झोपेंतहि दिवसाप्रमाणें तुम्ही स्वतःवर ताबा ठेवूं शकाल; कदाचित् दिवसापेक्षांहि अधिक. कारण रात्रीं शरीराच्या यांत्रिक हालचालींच्या बंधनांतून निदान अंशतः तरी, तुम्ही मुक्त असतां, स्वतंत्र असतां. शरीरगत चेतनेच्या ( Body Consciousness ) व्यापारांवर, प्रक्रियांवर संयम प्रस्थापित करणें अधिक दुर्घट काम; कारण त्यामध्यें मनाच्या किंवा भावनांच्या प्रक्रियांपेक्षां अधिक ताठरपणा असतो; आणि बदल होण्याची पात्रता कमी असते.

रात्रीं झोपेंत मन आणि प्राण—विशेषतः प्राण—अधिक क्रियाशील असतात. पण दिवसां त्यांच्यावर नियंत्रण पडलेलें असतें. कारण त्यांच्या स्वैर क्रिया आणि आविष्कार हे भौतिक चेतनेमुळें साहजिकच दडपले गेलेले असतात. झोपेंत हें दडपण रहात नसल्यानें मन आणि प्राण (भावना) यांच्या क्रिया स्वाभाविक आणि अनिर्बंध होऊं लागतात.

**"स्वप्न-रहित गाढ निद्रेचें स्वरूप काय असतें ?"**

सर्वसाधारणपणें तुम्ही ज्याला स्वप्नरहित निद्रा म्हणतां, ती या दोहोंपैकीं एक कांहींतरी असेल. एकतर तुम्हांला पडलेलें स्वप्न आठवत नसेल किंवा तुम्ही मरणप्राय अशा पूर्ण भानशून्य अवस्थेंत गेला असाल—एक प्रकारच्या मरणाचा अनुभव तुम्ही घेतला असेल. तरीपण अशी एक निद्रा शक्य असते कीं, जींत तुम्ही एकप्रकारच्या केवळ निश्चल-नीरवतेंत प्रविष्ट झालेले असतां; तुमच्या अंगप्रत्यंगांत एक प्रकारची स्थिरता आणि शांति अवतरलेली असते आणि तुमचें भान, तुमची जाणीव ही सच्चिदानंदीं विलीन होऊन गेलेली

असते. पण या अवस्थेस निद्रा हें नांव देतां येणार नाहीं; कारण तीमध्यें तुम्ही अत्यंत जाणीवपूर्ण व जागृत असतां. अशा अवस्थेंत तुम्ही कांहीं मिनिटेंच जरी राहिलांत, तरी या अत्यल्प निद्रेमुळेंहि जी विश्रांति आणि हुशारी तुम्हांला लाभते, तशी तासन्तास घेतलेल्या सामान्य निद्रेमुळेंहि मिळत नाहीं. ही अवस्था सहजगत्या मिळत नाहीं. त्यास दीर्घकालीन अभ्यासाची आवश्यकता असते.

**प्रश्न–स्वप्नांत ज्यांची गांठ पडते व ओळख होते, त्यांची नंतर बाह्य जगांतहि गांठ पडते व ओळख होते; हें कसें घडतें ?** CWMCE Vol 03 : Pages 10-16

(अपूर्ण) ––श्रीमाताजी

# ये यथा मां प्रपद्यन्ते––

गूढतेमध्यें गूढतर असें आणखी कांहीं आहे; उच्चतेमध्येंहि महानतर उच्चता आहे. स्वतःच्या अस्तित्वाची परिपूर्णता होण्यापूर्वींच त्वरेनें मनुष्य अनंततेच्या सीमेवर पोहोंचेल कारण त्याचें अस्तित्व अनंत आहे, दिव्य आहे. शक्ति-ज्ञान-आनंद यांच्या अनंतरूपासाठीं माझी अभीप्सा आहे. ती पूर्ण होईल कां ? होय. पण जिला अंत नाहीं तीच अनंतता; म्हणून 'मीं अनंतता मिळविली' असें न म्हणतां, 'अनंतताच मी होऊन जातो,' असें म्हणा. अशाप्रकारें स्वतःच ईश्वर होण्यानें मनुष्याला ईश्वर-प्राप्ति होऊं शकेल.

पण अशा रीतीनें त्याची प्रत्यक्ष प्राप्ति होण्यापूर्वींहि संस्पर्शद्वारां मनुष्य ईश्वराशीं कांहीं संबंध प्रस्थापित करूं शकतो. असे ईश्वराशीं नानाविध संबंध प्रस्थापित करणें म्हणजेच योग. योगाचें सर्वोत्तम उद्दिष्ट आणि अति उदात्त कृतार्थताहि हीच. मानवतेच्या मर्यादे-मध्यें राहून ईश्वराशीं विविध प्रकारें संबंध प्रस्थापित करण्याइतका विकास मानवानें साधला आहे. प्रार्थना, पूजन, स्तवन, यजन, चिंतन, श्रद्धा, शास्त्रज्ञान व तत्त्वज्ञान या नाना मार्गांनीं मानव त्याच्याशीं संबंध प्रस्थापित करतो. आतांपर्यंत विकसित झालेल्या आपल्या पात्रतेच्या व क्षमतेच्या आवांक्याबाहेरीलहि कांहीं संबंध आहेत. मानवता न ओलांडतांहि ते प्रस्थापित होण्याजोगे असून ते मानवाला यापुढें प्रस्थापित करावयाचे आहेत. योग या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या नाना साधनमार्गांनीं हेच विविध संबंध ईश्वराशीं जोडले जातात. ज्याच्याशीं हे संबंध जोडले जातात त्याला आपण कदाचित् ईश्वर या नांवानें ओळखीत नसूंहि. त्या ऐवजीं निसर्ग, उच्चतर आत्मा, अनंतत्व, किंवा कांहीं अवर्णनीय उच्च ध्येय अशीं नांवें आपण त्याला दिलेलीं असतील. अशाच एका मार्गानें बुद्धानें-हि ईश्वरच प्राप्त करून घेतला. पक्के अद्वैतवादीहि त्यांच्या मार्गानें जें मिळवितात तो ईश्वरच असतो. नास्तिकालाहि त्याच्या मार्गानें तोच उपलब्ध होतो. जडवाद्यानें आद्य-वस्तु मानलेल्या जडतत्त्वामध्येंहि तोच ईश्वर दडलेला असतो. शून्यामध्यें लपून राहून तोच ईश्वर शून्यवाद्याची प्रतीक्षा करतो.

ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् ।

––श्रीअरविंद

SABCL : Vol 17 : Page 05

# आगमन

(एक रूपक)

२९ फेब्रुवारी १९५६. उषःकाल.

नित्याप्रमाणें आजहि जेव्हां स्नान आटोपून व कमंडलू हातीं घेऊन नदीच्या पायऱ्या चढून वर आलों, तेव्हां कसल्यातरी स्तवनाचे सूर मला ऐकूं आले. त्या निस्तब्ध आसमंताला क्षुब्ध करीत एकांत चित्तानें तल्लीन होऊन कोणीतरी गात होतें––

**'नवजीवनाच्या नूतन प्रभाति प्रणति तुला,**
**तुझ्या आगमनें फुटले बांध, तुटल्या शृंखला**
**हे उज्ज्वल, हे निरुपम !.......'**

मी जवळ जाऊन पाहतो. उंच अश्वत्थ वृक्षाखालीं एक गौरकाय तरुण पुरुष बसलेला आहे. त्याच्या सर्वांगांतून प्रकाश निथत आहे. कसलीतरी गूढ मधुरिमा त्याच्या चेहऱ्यावर खेळत आहे. परमोज्ज्वलाचा व निरुपमाचा ज्याला साक्षात्कार झाला आहे, अन् त्या सादृश्यभावानें ज्याचें बांध फुटले आहेत व ज्याच्या शृंखला तुटल्या आहेत अशा या महाभागाची कोणती नूतन प्रभात, कोणतें नवजीवन ?

त्याच्या स्तवनाचे सर्व शब्द आठवत नाहींत, पण जेवढे लक्षांत राहिले त्यांच्या भावहिल्लोळांनी मी ओथंबून राहिलों आहे. त्याच्या वाणींतली ओजस्विता सरळ हृदयाला जाऊन भिडत आहे आणि पुण्यपावन गंगादेखील त्याच्या नवसंदेशानें पुलकित होऊन कलकल निनादानें सर्व जगाला जाहीर करीत आहे, "तुझ्या आगमनें फुटले बांध, तुटल्या शृंखला, हे उज्ज्वल, हे निरुपम ! "

एके दिवशीं भारताच्या तपोवनांत असाच एक गंभीर ध्वनि ऐकूं आला. त्यावेळेस त्यानें आपल्या ओजस्वी मांगल्यानें सारा दिग्दिगंत जागविला आणि त्याच्या यज्ञाग्नीच्या ज्वालांनीं सारें भूमंडळ चेतविलें गेलें :––

**शृण्वन्तु विश्वे अमृतस्य पुत्रा**
**आ ये दिव्यधामानि तस्थुः।**
**वेदाहमेतं पुरुषं महान्तम्**
**आदित्यवर्णं तमसः परस्तात्।**

दिव्य धामीं निवास करणाऱ्या अमृताच्या पुत्रांनो, सारेजण ऐका : ज्योतिर्मय व अज्ञानातीत अशा महान् पुरुषाला मी जाणलं आहे.

या वाणीच्या अविरत प्रभावानें भारताची संस्कृति अपूर्व कांतीनें प्रदीप्त झाली अन् म्हणाली, 'वेदाहमेतम्' : मी जाणलं आहे.

भारताचें शिल्प गिरिकंदरांत चैतन्यमय होऊन म्हणालें : मी जाणलं आहे, त्याच्याशीं तादात्म्य पावलों आहे, त्यांत समाहित झालों आहे.

इतकंच नव्हे तर नृत्यकलेच्या नूपुरांतून, संगीताच्या झंकारांतून, वीरश्रीच्या वैभवांतून

व चारित्र्याच्या गौरवांतूनहि एकसमयावच्छेदेंकरून एकच प्रचंड निनाद प्रस्फुटित झाला, 'वेदाहमेतम्'.

त्या तरुण गौरकाय महापुरुषाला असंच कांहीं का आज जगाला सांगायचं आहे? अश्वत्थ वृक्षाखालीं एकाकी ऐकांतिक गांभीर्यानें तो कसली घोषणा करीत आहे—'अभूतपूर्वं न कदापि श्रुत्वा'?

होय. पूर्वीं कधींहि न ऐकलेलं असंच अभूतपूर्व कांहींतरी त्याला आज जाहीर करायचं आहे. ऐक, हे चराचरांतील अणुरेणूसमूह! वातावरणांतून एक गूंजन उठतें आहे. पृथ्वीच्या गतिपूर्ण कल्लोळांतहि आज गुप्त निनाद उठताहेत :

**इदं श्रेष्ठं ज्योतिषां ज्योतिः आगात् चित्रः प्रकेतो अजनिष्ट विभ्वा।**
**उदीर्ध्वं जीवो असुर्न आगादप प्रागात्तम आ ज्योतिरेति ॥**

या प्रतीयमान सकल प्रकाशांना प्रकाशित करणारा महत्तम, उच्चतम प्रकाश आला आहे. सर्व ज्योतींना मूलभूत असें प्रज्ञान मला सर्वतोंभावें प्राप्त झालें आहे. अज्ञानांधकाराच्छन्न सकलांना विज्ञापक अशा या महान् व रमणीय ज्योतीचा रश्मिसमूह अवतरून माझ्यामध्यें प्रादुर्भुत झाला आहे. उठा, हे माझ्या प्रिय संतानगण! परमात्म-ज्योति आली आहे. अज्ञानाचा अंधःकार दूर झालेला आहे. जीवात्मा चैतन्यप्राप्त झाला आहे. 'उत्तिष्ठत जाग्रत.'

वेदोपनिषदांचा हा विस्मृत स्वरच आज पुनश्च त्याच्या मुखांतून स्रवतो आहे.

मी प्रणाम करून त्या दिव्य पुरुषाच्या पुढें बसलो आहे. चित्तवृत्ति स्थिर झाल्या आहेत. प्राणाचें सारें चांचल्य ओजसांत परिणत झालेलें आहे. शरीराची अस्मिता देखील 'भूमा' मध्यें व्यापक झालेली आहे. पूर्ण आत्मसमर्पणाची साधना या क्षणीं सिद्ध झाली आहे.

अन् काय आश्चर्य! त्या महापुरुषाच्या अनिर्वचनीय प्रभावानें माझेंहि शरीर तेजःपुंज झालें आहे. **तस्य भासा सर्वमिदं विभाति.** माझ्या आंतून स्वाभाविकपणें निघणाऱ्या स्निग्ध प्रकाशाच्या आल्हादकारक आंचेनें मानवांच्या जीवनांत आनंदमय परिवर्तन होत आहे. मी आकाशांत उडूं लागलो आहे. तेथें पक्ष्यांच्या पंखांचा मला आधार नाहीं; तेथें मानवाच्या विमानांची किमया नाहीं. वाटेल तेव्हां व वाटेल तेथें मी संचार करूं शकतो आहे. अन् तरी पण पृथ्वी हेंच माझें आसन आहे. पद्भ्याम् पृथ्वी। पृथिवी पाजस्याम्।

मला मानवनिर्मित वस्त्रांची आवश्यकता नाहीं. माझ्या शरीराच्या विशिष्ट गुणधर्मामुळेंच निरनिराळीं आभूषणें आकार धारण करीत आहेत.

शरीर निरनिराळा आकार घेऊं शकत आहे. नवें शरीर घेण्यासाठीं मला जन्ममृत्यूच्या परिवर्तनांतून जाण्याची अटळ आवश्यकता नाहीं. आपलें वानर रूप बदलून व ब्राह्मणभक्ताचें रूप धारण करून अशोकवनांत सीतेपाशीं जाणाऱ्या हनुमानाप्रमाणें आणि कर्णाला कवचकुंडलें मागणाऱ्या अतिथीचें रूप धारण करणाऱ्या देवराज इंद्राप्रमाणें—किंबहुना त्याहूनहि अधिक प्रभावी रीतीनें इच्छामात्रें आकार बदलविण्याची क्षमता मला प्राप्त झाली आहे. मी अमर झालों आहे.

'आत्म्याच्या विशाल बाहूंत पृथ्वीला मी आलिंगन देत आहे.

या परिवर्तनशील जगांत अमर असा मी उभा आहे.

मृत्यूविहीन मी क्षणभंगुर वस्तूंना हाताळत आहे.

माझ्या शांत व विशाल नेत्रांत दुःख व दीनता यांच्या आक्रमक शक्तींपेक्षांहि प्रबळ असा आल्हाद खेळत आहे.

भगवंताची अनंतता माझ्यांमधून सीमित आकारांशीं संलग्न होत आहे.

मानवतेमध्यें मी दिव्यतेचा प्रतिनिधि आहे.

मी आहे विश्व-मित्र, मी आहे परात्पराचा प्रकाशकिरण !'

माझ्याप्रमाणेंच अनेक महामानव तेजःपुंज होऊन वर उठत आहेत, शेंकडां, हजारों दिव्य मानव ! नवीन जाति जन्म पावत आहे. पत्थराच्या सुप्त चेतनेंतून वनस्पतींचें हिरवें वैभव उदयास आलें; त्यांत कीट-जंतु-जनावर यांचा प्रादुर्भाव झाला आणि नंतर निर्मितीच्या क्षितिजावर मनाचें शिरस्त्राण धारण करून मनुष्यानें पाऊल घातलें. आज कितीतरी युगांच्या त्याच्या अभीप्सेचें सार्थक होऊन, उत्क्रांतीच्या पुढच्या प्रवासांतून दिव्यमानव तयार होत आहेत, शेंकडों हजारों दिव्यमानव !

अन् तरी पण मानवजातीचा रथ तशाच वेगानें पूर्ववत् चालत आहे. पूर्वी पृथ्वीवरून चालत असे—विसंवादाची धूळ उडवत. माझ्या आगमनानें एक अंगुष्ठ वर हवेंत चालत आहे—सुसंवादाचें सुरेल गीत गात !—एवढाच महान् फरक !

मी डोळे उघडले. त्या गौरकाय महापुरुषानें माझ्या डोळयांत आपली दृष्टि लावली-अंतराळाची अनंत नीलिमा अन् सागराची अनंत प्रशांत गहनता त्यांच्या दृष्टींत मला आ-ढळली-अन् तो हंसला. एक स्नेहमय, करुणामय, वात्सल्यमय हास्य! बुद्धाची करुणा येशूचें पावित्र्य, कृष्णाची दिव्य मधुरिमा त्याच्या हास्यांतून प्रगटत होती.

या पंधरा मिनिटांत मी काय बघितलें, काय ऐकलें याचा चित्रपट माझ्या चर्मचक्षूंपुढें आला आणि कांहींसा स्तंभित होऊन मी म्हटलं, "तर मग हें सारं खरं आहे काय?"

"तथास्तु" त्यानें उत्तर दिलें अन् तो अदृश्य झाला.

आणि त्या दिवसापासून प्रातःकाळीं दररोज स्नान आटोपून व कमंडलू हातीं घेऊन नदीच्या पायऱ्या चढून जेव्हां मी वर येतो, तेव्हां त्या पिंपळाच्या वृक्षामधून तेच मधुर संगीत ऐकूं येतें.—

"नवजीवनाच्या नूतन प्रभातीं......"

त्याच्या नवसंदेशानें पुलकित होऊन पुण्यपावन गंगा देखील कलकल निनादानें सर्व जगाला जाहीर करीत आहे.—

**शृण्वन्तु विश्वे अमृतस्य पुत्रा। आ ये दिव्यधामानि तस्थुः।**
**वेदाहमेतं पुरुषं महान्तम्। आदित्यवर्णं तमसः परस्तात्॥**

—गजराज

# जगन्नाथाचा रथ

आदर्श समाज हाच आहे मानव-समष्टीचा आंतरात्मा, परमेश्वराचें वाहन, जगन्नाथाच्या यात्रेचा रथ. एकत्व, स्वातंत्र्य, ज्ञान व सामर्थ्य हीं त्या रथाचीं चार चाकें आहेत.

परंतु मानवी बुद्धिमत्तेनें घडविलेला अथवा प्रकृतीच्या अशुद्ध प्राणमय लीलेंतून जन्माला आलेला वास्तविक समाज मात्र याहून निराळा असतो. असा समाज हा, मानव समूहावर अधिराज्य चालविणाऱ्या जगन्नाथाचा रथ नसतो; तर स्वतंत्र आत्म्याला आच्छादून टाकणाऱ्या व मानवामध्यें चाललेल्या भागवत कार्याबद्दल गैरसमज उत्पन्न करणाऱ्या सामूहिक अहंकाराचें तो वाहन असतो. नानाविध उपभोगांनीं युक्त अशा कार्यपथावरून हें वाहन निर्हेतुकपणें चाललेलें असतें. बुद्धीचा अपरिपक्व निश्चय व अशुद्ध निम्न प्रकृतीच्या नव्या-जुन्या प्रेरणा त्यास हांकीत असतात. जोपर्यंत अहंकाराकडे स्वामित्व असतें, तोपर्यंत त्यास ध्येयबिंदू सांपडणें अशक्य असतें; जरी तो माहीत असला तरीहि रथ थेटपर्यंत तेथें हांकणें फारच जड जातें. कारण व्यष्टि वा समष्टि ह्यांच्या दिव्य पूर्णत्वसिद्धीच्या मार्गांत अहंकार हा एक फारच मोठा अडथळा असतो.

सामान्य समाजाचे तीन प्रमुख प्रकार पडतात. त्यांतील समाजाचा पहिला प्रकार हा कुशल सारथ्यानें चालविलेल्या सुंदर तेजस्वी, शुद्ध व प्रसन्न अशा रथाप्रमाणें असतो. मजबूत व तरबेज घोडे त्यास ओढीत असतात. साध्या मार्गावरूनच तो अत्यंत काळजीपूर्वक व धिमेपणानें चाललेला असतो. सात्विक अहंकार हा त्यांतील प्रवासी असतो. ज्या प्रदेशावर परमेश्वराचें मंदिर वसलेलें आहे त्यास हा रथ सतत प्रदक्षिणा घालीत असतो. परंतु तो स्वतःस नेहमींच कांहीं अंतरावर ठेवतो व म्हणूनच त्या उच्च शिखराच्या सर्वांत जवळच्या भागीं पोंचणें त्यास कठीण पडतें. त्यांतील प्रवाशाला जर तेथें पोंचावयाचें असेल, तर त्यानें रथाखालीं उतरून पायीं चालत गेलें पाहिजे. वेदोत्तर कालांतील प्राचीन आर्यसमाज अशा प्रकारचा रथ म्हणतां येईल.

दुसरा प्रकार विलासी, सुखलोलुप माणसाच्या मोटरगाडीचा.—धुराळ्याचें वादळ उडवीत, विलक्षण बेफामपणें व पों पों च्या गर्जनेनें राजमार्ग तुडवीत आपल्या वादळी आणि अप्रतिहत गतीनें दौडत व इतर जाणाऱ्या-येणाऱ्यांचें कान आपल्या आवाजानें बधीर करीत जाणाऱ्या आणि वाटेंत जो कोणी येईल त्याचा आपल्या चाकांखालीं चक्काचूर करून सतत पुढें जाणाऱ्या मोटारीचा होय. यांतून जाणाऱ्या उतारूचें जीवन हें पावलागणिक धोक्यांत पडण्याची शक्यता असते. क्षणोक्षणीं धक्के-धोके खात आणि अनेक दुर्घटनांतून गेल्यानें ही मोटार मोडकळीस येते व अत्यंत श्रमपूर्वक पुनः दुरुस्त केल्यावरहि पुनः पहिल्या-सारख्याच बेफामपणानें ती चकरा खाऊं लागते. ह्या मोटारीपुढें कोणतेंच ठिकाण निश्चित नसतें; परंतु दृष्टिपथांत येणाऱ्या प्रत्येक नवीन दृष्याकडे तिचा चालक जो राजसिक अहंकार तो गाडी पळवतो आणि थरारलेल्या आवाजानें 'हेंच तें ध्येय, हेंच तें ध्येय' असें ओरडत सुटतो. या गाडींतून प्रवास करणाऱ्यास खूप चैनीचा व सुखाचा आस्वाद घेतां येतो.

अर्थात् कधीं कधीं अटळ अशा धोक्याचेहि प्रसंग नसतात असें नाहीं. पण त्याहून विशेष म्हणजे ही मोटार आपणांस परमेश्वरापाशीं कधींच घेऊन जाऊं शकत नाहीं. आधुनिक पाश्चात्य समाज हा ह्या मोटरगाडीप्रमाणेंच आहे.

तिसरा प्रकार हा एखाद्या गलिच्छ, जुन्यापुराण्या मोडकळलेल्या बैलगाडीप्रमाणें असतो. कांसवाच्या मंदगतीनें तिची वाटचाल होत असते. अंग झडलेली, भुकेकंगाल, मरतुकडी, अशी. एक बैलांची जोडी त्यास ओढत असते. अरुंद, गांवठी पायवाटेनें ही गाडी रखडत चाललेली असते. तिच्या मध्यें एक आंधळा, रिकामटेकडा, पोटार्थी म्हातारडा, मळकट लक्तऱ्या घालून आपल्याच कैफांत गुंग होऊन, चिखलानें बरबटलेला हुक्का मोठ्या हौसेनें ओढत, गाडीचा खडखडाट ऐकत बसलेला असतो. आपल्याच भूतकालांतील अंधुक व विकृत स्मृतींमध्यें तो दंग असतो. ह्या गाडीचा मालक असतो तामसिक अहंकार आणि गाडीवानाचें नांव असतें पुस्तकी-पांडित्य. पंचांगाचा आधार घेऊन गाडीच्या निघण्याची वेळ व जाण्याची दिशा तो ठरवतो व एकसारखा स्वतःशीं असे शब्द पुटपुटत असतो, "जें कांहीं आहे आणि होतें तें सगळें चांगलें आहे. पण कांहीं नवीन करण्याचा प्रयत्न करणें मात्र वाईट आहे." ही बैलगाडी जरी आपणाला परमेश्वराकडे नेत नसली तरी तिच्यामुळें आपणांस अव्यक्त अक्षर ब्रह्माकडे लवकरच जाण्याची शक्यता मात्र आहे.

तामसिक अहंकाराची ही बैलगाडी परंपरागत खेडवळ कच्च्या सडकेनें जोंपर्यंत जात असते, तोंपर्यंत ती सुरक्षित असते. परंतु जगाच्या हमरस्त्यावर जेव्हां ती येऊन पोंहोचते व भरधांव वेगांत सैरावैरा धावणाऱ्या मोटारगाड्यांच्या कोलाहलांत सांपडते, तेव्हां तिची काय स्थिति होईल या विचारानें अंगावर शहारे येतात. कारण अडचण ही आहे कीं, मार्ग केव्हां बदलावयाचा हें पाहणें किंवा जाणणें हें तामसिक अहंकाराच्या शक्तीपलीकडचें आहे. वरें, हा धोका कबूल करण्याचीहि त्याची तयारी नसते; कारण तसें केल्यास आपलें मार्ग-दर्शकत्व व मालकी आपल्याला गमवावी लागेल असें त्याला वाटतें. ज्यावेळीं अशा प्रकारचा प्रश्न समोर उभा राहतो, त्यावेळीं कांहीं उतारू असें म्हणूं लागतात कीं, "कांहीं हरकत नाहीं. आहे हें असेंच असूं दे. आहे तेंच बरें आहे. कारण तें आपलें आहे." हीं माणसें म्हणजे पुराणमताभिमानी वा भावनाप्रधान देशभक्त. कांहीं उतारू असें म्हणतात कीं, "जरा इकडे तिकडे थोडी दुरुस्ती करूं या. त्यायोगें सहजपणें ह्या गाडीचें रूपांतर, निर्दोष व मूल्यवान् मोटारींत होईल."—या माणसांना 'सुधारक' समजलें जातें. कांहींजण म्हणतात कीं, "आपला पूर्वीचा सुंदर रथ पुनः आणूं या." ही अशक्यप्राय घटना घड-विण्याचीं साधनें गोळा करण्याच्या उद्योगास ते लागतात. परंतु त्यांचा उद्योग कांहीं सफल होण्याचें लक्षण कोठें दिसत नाहीं.

ह्या तिहींपैकीं कशाची तरी निवड केलीच पाहिजे, असे जर आपणांवर अनिवार्य बंधन असेल व त्याहून उच्चतर शोध व उद्योग करण्यास जर आपण कचरत असूं तर मग सात्विक अहंकाराचा नवीन रथ बांधणेंच आपणांस जास्त सयुक्तिक वाटेल. परंतु जोपर्यंत जगन्नाथाचा रथ पृथ्वीतलावर प्रकट होत नाहीं, तोपर्यंत आदर्श समाजाची संघटना करणें हें खरोखर अशक्यच आहे. कारण तेंच चिरवांछित ध्येय आहे, अंतिम उद्दिष्ट आहे; उच्चतम व गभीरतम अशा सत्याचें प्रकटीकरण व प्रतिकृति-निर्मिति आहे.

विश्वामध्यें सुप्तपणें वास करणाऱ्या सर्व-पुरुषाच्या प्रेरणेनें उद्युक्त होऊन मानवजात आदर्श समाज उत्पन्न करण्यामध्यें सतत मग्न होऊन राहिली आहे; परंतु अंध प्रकृतीच्या वा अज्ञानाच्या प्रभावामुळें ती एक निराळीच प्रतिमा वा सँमिश्रण करीत असून तें एकतर विकृत, ओबडधोबड व ओंगळ आहे किंवा त्याचेवर सौंदर्याचा आविर्भाव असला तरी तें फारच सामान्य दर्जाचे, अर्धसुंदर व अपूर्ण आहे. शिवशंकराच्या ऐवजीं तिनें एकादा वानर किंवा राक्षस वा सामान्य दर्जाच्या मानव-जातीचा एखादा अर्ध-देव निर्माण केला आहे.

जगन्नाथाच्या रथाची खरी आकृति वा रचना ही सर्वांना पूर्णत: अज्ञात आहे. कोण-त्याहि निपुण जीवन-कारागिरास त्याची रूपरेषा काढतां आलेली नाहीं. जगन्नियंत्यानें तें चित्र स्वत:च्या हृदयांत उठविलेलें असून अनेकविध आवरणांनीं तें आवृत्त आहे आणि आपल्या अनेक भागवत अवतारांतून द्रष्टा व कर्ता या रूपानें सतत नानाविध प्रयत्न करून त्या चित्राचें हळुहळु अनावरण करावें व भौतिक जगामध्यें त्याची प्रतिष्ठा करावी असा त्या दिव्य द्रष्टयाचा हेतु आहे.

★ ★ ★

जगन्नाथाच्या रथाचें खरें नांव समाज नसून 'संघजीवन' असें आहे. बहुमुखी, शिथिल जन-समूह किंवा सांवरून धरलेला मानवांचा विस्कळित जमाव म्हणजे हा जगन्नाथाचा रथ नाहीं. भागवत संघ हा स्वतंत्र व मुक्त आत्म्यांचा संघ असतो. सर्व बंधनें व भेद ह्यांतून मुक्त व स्वतंत्र झालेले व केवळ आनंद-घनतेनें आणि भागवत आत्म्याच्या ज्ञानसामर्थ्यांतून निघणाऱ्या समन्वय-शक्तीनें एकत्र व संघटित झालेलें तें समष्टिजीवन असतें.

अनेक व्यक्तींच्या एकत्रीकरणांतून व तद्वारां संघटित कार्य करणारें समष्टि-शरीर वा समुदाय ह्यास समाज अशी संज्ञा प्राप्त होते. व्युत्पत्ति-शास्त्रहि त्याचा हाच अर्थ ध्वनित करतें. 'सम्' ह्या उपसर्गाचा अर्थ एकत्रितपणा असा होतो व 'अज्' या धातूचा अर्थ जाणें, धावणें वा युद्ध करणें असा आहे.

अनेक कार्यें सिद्ध करण्यासाठीं, नाना आत्म-संभावित इच्छांची परिपूर्ति करण्यासाठीं जवळ आलेल्या हजारों परस्परावलंबी माणसांचा समूह, असें आपल्या प्राथमिक समाजाचें स्वरूप असतें. एकाच कार्यक्षेत्रांत विविध उद्दिष्टांमागें ते लागतात व ह्या उपद्व्यापाच्या योगें त्यांच्यामध्यें पुढें कोणीं जावयाचें व आपणां सर्वांमध्यें श्रेष्ठ कोण अशी तिखट स्पर्धा वाढीस लागते.

नवीन समाजव्यवस्थेच्या या पार्श्वभूमींतून, ह्या सर्व गडबडींतून व गोंधळांतून सह-कार्यासाठीं व मानसिक परिपूर्तीसाठीं अनेक संबंध प्रस्थापित होतात, नानाविध आदर्श पुढें ठेवले जातात, व त्यांतून कांहींतरी अ-संपूर्ण व क्षणिक अशी निष्पत्ति होते.

आरंभीच्या समाजाचा पाया, भेद हा असतो व त्या भेदाची उभारणी अर्धवट, अनि-श्चित व अल्पजीवि एकतेवर झालेली असते. परंतु आदर्श समाजाची उभारणी ही त्याच्या अगदीं उलट असते. एकत्व हा तिचा पाया असतो. भिन्नतेची लीला ही भेदाच्या भिंती उभारण्याकरितां अस्तित्वांत न येतां उलट, आनंदाचा चित्रविचित्र आविर्भाव प्रकट करावा म्हणून होत असते. सामान्य समाजामध्यें शरीर, मन आणि कार्य यांच्या एकतेचें, समन्वयाचें

अंशतः दर्शन होतें; परंतु संघाचें जीवन एकात्मतेनें केवळ रसरसलेलें असतें.

मर्यादित क्षेत्रांत कां होईना, परंतु ह्या संघजीवनाचे कांहीं अपुरे व निष्फळ प्रयत्न पूर्वी करण्यांत आलेले आहेत. 'क्वचित् ते पाश्चिमात्य जगाप्रमाणें बौद्धिक कल्पना व प्रेरणा ह्यांतून उत्स्फूर्त झालेले असतील अथवा भगवान् बुद्धाच्या अनुयायांप्रमाणें, निर्वाण प्राप्त करून देणाऱ्या कर्म-संन्यासाचा स्वतंत्र उपभोग घेण्यासाठीं झाले असतील अथवा आद्य ख्रिश्चन चर्चप्रमाणें भागवत प्रेमाच्या प्रवृत्तींतून झाले असतील; परंतु कांहीं काळांतच असें घडतें कीं, सामाजिक दोष, अपूर्णता व मानवी स्वभावाच्या एकांगी प्रवृत्ती ह्या नूतन संघाच्या आत्म्यामध्यें हळुहळु प्रवेश करूं लागतात व त्याचें सामान्य समाजांत रूपांतर करतात. चंचल बुद्धीचे विचार अल्पजीवी ठरतात व नवें किंवा जुनें जीवन निसर्ग-प्रवृत्तींच्या अप्रतिहत प्रवाहानें धुवून नेलें जातें. केवळ भावनात्मक आवेगांवर अशा उद्योगांत यश मिळविणें तर अशक्यच आहे. कारण भावना आपल्या आवेशानेंच थकून जातात. केवळ निर्वाण-प्राप्तीची अभीप्सा धरणें ठीक आहे पण निर्वाणाच्या प्रेमामधून संघ-जीवन उत्पन्न करणें ही तर एक चमत्कारिक गोष्ट होय. संघ हा सामान्यतः कार्य व संघटना यांचें पोषण करणारें क्षेत्र असतो.

ज्या दिवशीं ज्ञान, भावना व कार्य ह्यांच्या समन्वयांतून व एकत्वांतून आत्मैक्य प्रकट होईल. तो दिवस नवीन युगाच्या जन्मदिनांचा सोहळा पाहील, महान् संघात्म्याच्या उत्स्फूर्त संकल्पांतून जगन्नाथाचा रथ जगाच्या महान् राजपथावर जनसंमर्दास दर्शन देईल व दशदिशांस स्वतःच्या प्रकाशानें तेजोमय करून सोडील. तेव्हां पृथ्वीच्या वक्षःस्थलावर सुवर्णयुग अवतरेल व नैतिक मानवांच्या जगाचें रूपांतर दैवी लीलागृहांत, भगवंताच्या मंदिर-नगरींत, आनंदपुरींत होईल.

——श्रीअरविन्द.

'धर्म' या बंगाली साप्ताहिकावरून

The Chariot of Jagannath : Writings In Bengali Translation

साधनेमध्यें प्रत्येकाची गति व मार्ग स्वतंत्र असतो. सर्वांनाच दृष्टांत व प्रकाश दिसतात असें नाहीं——ह्या गोष्टींचें साह्य होतें, पण त्याहिपेक्षां समर्पण आणि स्वभावपरिवर्तन घडणें ही गोष्ट सर्वांत अधिक महत्त्वाची आहे.

जुलै १९३३

★

विचार वा वासना यांच्या पाठीमागें धांवत सुटणें याला कांहीं ध्यान म्हणतां येणार नाहीं. ही अवस्था तर त्याज्य मानली पाहिजे—शांत नीरव मन हें ध्यानासाठीं आवश्यक असतें. विचारांबरोबर धांवपळ करीत राहण्यापेक्षां श्रीमातेचें स्मरण करणें अधिक बरें.

१५-१२-३३.

—श्रीअरविंद

★

# भारतीय धर्माचीं मूलतत्त्वें

भारतीय धार्मिक मनाच्या समन्वयी वैशिष्ट्यावर आणि सर्वसमावेशक ऐक्यावर जोर देणें अगत्याचें आहे; कारण नाहींतर, भारतीय जीवनाचा संपूर्ण अर्थ व भारतीय संस्कृतीचा समग्र आशय आपणांस जाणतां येणार नाहीं. हें व्यापक व लवचिक वैशिष्ट्य विचारांत घेतल्यानंतर त्याचा, समष्टि आणि व्यष्टिरूप जीवनावर झालेला पूर्ण प्रभाव आपण समजूं शकतों; आणि आपणांस जर असा प्रश्न विचारला कीं, "अखेरीस तुमचा हिंदुधर्म काय आहे? त्याची शिकवण काय आहे? तो कशाचें आचरण करतो? त्याचे सर्वमान्य घटक कोणते आहेत?"––तर आपण असें उत्तर देऊं शकतों कीं, तीन मूलभूत कल्पनांवर किंवा त्यापेक्षां, उच्चतम व विशालतम आध्यात्मिक अनुभवाच्या तीन मुख्य तत्त्वांवर भारतीय धर्माची स्थापना झाली आहे. प्रथमची कल्पना आहे वेदप्रणित 'एकं सत्' ची, ज्याला ऋषींनीं भिन्नभिन्न नांवें दिलीं व जें उपनिषदांतील एकमेवाद्वितीय असलेलें 'सर्व' असून त्याच्या अतीत आहे, बौद्धांचें 'शाश्वत' (Permanent) आहे, मायावाद्यांचें 'केवल' आहे व आपल्या शक्तींत जीव आणि प्रकृतीची धारणा करणारा आस्तिकवाद्यांचा 'परम ईश्वर' किंवा 'पुरुष' आहे––एका शब्दांत, 'सनातन' 'अनंत' हा सर्वसंमत पहिला आधार आहे; परंतु मानवी बुद्धि त्याला अनंत सूत्रांतून प्रकट करूं शकते; नव्हे करते. ह्या शाश्वताचा, ह्या अनंताचा, ह्या सनातनाचा शोध घेऊन व त्याच्या अत्यंत समीप जाऊन कोणत्याहि प्रकारें अथवा कांहीं प्रमाणांत तरी त्याच्याशीं एकरूप होणें, त्यामध्यें प्रवेश करणें हें त्याच्या आध्यात्मिक अनुभवाचें अत्युच्च शिखर आहे, व हाच त्याचा अन्तिम प्रयत्न आहे. हाच भारतीय धार्मिक मनाचा सर्व प्रथम विश्वव्यापी संप्रदाय आहे, विश्वास आहे, जीवनमंत्र आहे. (Credo)

हा आधार कोणत्याहि स्वरूपांत तुम्हीं स्वीकारा व भारतांत ज्ञात असलेल्या सहस्त्र मार्गांपैकीं कोणत्याहि एकानें किंवा त्यांच्यामधून पल्लविलेल्या कोणत्याहि नवीन उपमार्गानें ह्या महान् आध्यात्मिक ध्येयाचें अनुसरण करा; तर तुम्ही धर्माच्या गाभ्याप्रत पोहोंचाल. कारण शाश्वत व अनंत यांप्रत अनेक मार्गांनीं जाण्याची मनुष्याची शक्यता ही या धर्माची दुसरी मूलभूत कल्पना आहे. अनंत, आपल्या अनेक अनंततांनीं परिपूर्ण आहे आणि या अनंततांतील प्रत्येकहि स्वतां 'शाश्वत'च आहे. येथें ईश्वर स्वतः विश्वाच्या बंधनांतच प्रकट होतो व अनेक मार्गांनीं जगांत स्वतःस परिपूर्ण करीत असतो; परंतु प्रत्येक मार्ग हा शाश्वतचाच मार्ग असतो. प्रत्येक नाशवंतांतून आपण अनंताचा शोध करूं शकतो; आणि त्याचीं रूपें व प्रतीकें असलेल्या सर्व वस्तूंतून त्याच्या सन्निध आपण जाऊं शकतो; विश्वांतील सर्व शक्ती त्याच्या अभिव्यक्ती आहेत. सर्व प्रकारचें बळ हें एकमेवाचेंच बळ आहे. प्रकृतीच्या कार्यामागील देव हे एकाच देवाधिदेवाच्या शक्ती, त्यांचीं नांवें किंवा व्यक्तित्वें आहेत असें समजून त्यांची आराधना केली पाहिजे. एकच अनंत चित्-शक्ति, कार्यप्रवण-शक्ति, संकल्प-शक्ति किंवा नियम, माया, प्रकृति, शक्ति किंवा 'कर्म' सर्व घटनांच्या मागें विद्यमान् आहे, मग त्या घटना आपणांस चांगल्या अथवा वाईट, मान्य वा

अमान्य, अनुकूल किंवा प्रतिकूल, भाग्याच्या किंवा दुर्भाग्याच्या कशाहि दिसत असोत. 'अनंत' हा सृष्टिरचना करतो आणि ब्रह्म होतो; तो पालन करतो आणि विष्णु होतो; तो संहार करतो किंवा स्वतःला स्वतांत सामावून घेतो व रुद्र किंवा शिव होतो. धारणा आणि संरक्षण करणारी दयाशील परमशक्ति-लक्ष्मी किंवा दुर्गा-हीच जगतांची माता आहे अथवा तीच हीं रूपें धारण करते; किंवा संहारक रूपांतील ती कृपाळु चण्डी किंवा काली देखील कृष्णवर्णी माताच आहे. एकच देवाधिदेव त्याच्या गुणरूपांनीं विविध नामांत व देवतांत प्रकट होतो. वैष्णवांचा दिव्यप्रेममय ईश्वर व शाक्तांचा दिव्यशक्तिमय ईश्वर हे दोन निराळे देव दिसतात; परंतु प्रत्यक्षांत एकाच अनंत देवाचीं तीं निरनिराळीं रूपें आहेत.* यांतील कोणत्याहि नामांतून अथवा रूपांतून जाणीवपूर्वक वा अजाणतां मनुष्य परमेश्वराच्या समीप जाऊं शकतो; कारण त्यांच्यांतून किंवा त्यांच्या अतीत जाऊनच आपण उच्चतम अनुभवप्राप्तीकरितां पुढें जाऊं शकतो.

एक गोष्ट नमूद करावीशी वाटते कीं, आधुनिक जड युक्तिवादाशीं बौद्धिक तडजोड साधण्यासाठीं बहुतेक आधुनिक विचारसरणीचे भारतीय धर्मवेत्ते ह्या गोष्टींना प्रतीकें समजून दूर सारण्याचा प्रयत्न करतात; असा त्यांचा कल दिसत असला तरी प्राचीन भारतीय मनोवृत्तीनें, त्यांना केवळ प्रतीकें म्हणूनच न पाहतां जगत्-सत्यें, सारतत्त्वें या दृष्टीनें त्यांच्याकडे पाहिलें-मग हीं सत्यें मायावाद्यांच्या दृष्टीनें मायिक जगतांतील कां असेनात. कारण अचिन्त्य असलेली उच्चतम सत्ता आणि आपली भौतिक सत्ता यांमध्यें भारताच्या आध्यात्मिक आणि आन्तरात्मिक ज्ञानसरणींनें दोन असंबंधित विरोधी तत्त्वांप्रमाणें, महदंतर ठेवलें नाहीं. चेतनेच्या अन्य मानसिक स्तरांची व अनुभवांची त्याला जाणीव होती आणि या अतिभौतिक स्तरांचीं सत्यें त्याला भौतिक विश्वाच्या बाह्यात्कारी सत्यांहून कांहीं कमीं खरीं वाटत नव्हतीं. मनुष्य प्रथम त्याच्या मानसिक प्रकृतीनुसार व गहनतर अनुभव घेण्याच्या योग्यतेनुसार—त्याचा स्वभाव व अधिकार यानुसार ईश्वराप्रत जाऊं लागतो. सत्याच्या कोणत्या पातळीपर्यंत, जाणीवेच्या कोणत्या स्तरापर्यंत तो पोंहोंचूं शकतो हें त्याच्या आंतर-विकासाच्या अवस्थेनुसार ठरविलें जातें. तेथूनच धार्मिक संप्रदायाचीं विविधता निर्माण होते. परंतु त्या सर्वांनीं स्वीकारलेलीं आधारतत्त्वें हीं कल्पनारचित नाहींत अथवा पुरोहितांचे किंवा कवींचे शोध नाहींत, तर भौतिक जगताच्या चेतनेचीं व केवलाच्या अनिर्वचनीय अतिचेतनेमध्यें असलेल्या अतिभौतिक सत्तेचीं तीं सत्यें होत.

भारतीय धर्माच्या आधारांत मुळामध्यें कार्यकारी असलेला दृढतम महत्त्वाचा विचार हा आंतर आध्यात्मिक जीवनाच्या दृष्टीनें अत्यंत प्रभावशाली आहे. हा विचार असा आहे कीं, जसें विश्वचेतनेच्या द्वारां किंवा समस्त आंतरबाह्य प्रकृतीला भेदून परम 'तत्' च्या किंवा परमेश्वराच्या सन्निध जातां येणें शक्य आहे, तसेंच प्रत्येक व्यक्तिगत जीवास स्वतांतच किंवा त्याच्या स्वतःच्या आध्यात्मिक सत्तेच्या भागांत 'तत्' ची किंवा ईश्वराची प्राप्ति

*भारतीय अनेकदेवतावादाचें हें स्पष्टीकरण म्हणजे पाश्चात्यांच्या निंदाप्रचुर टीकांना उत्तर म्हणून शोधून काढलेला आधुनिक शोध नव्हे; गीतेंत याचें स्पष्ट वर्णन आहे. अधिक प्राचीन काळांत देखील उपनिषदांचा हाच अभिप्राय आहे; अतिप्राचीन वैदिक गूढवादी कवींनीं अनेक शब्दांत त्याचें निःसंदिग्ध वर्णन केलें आहे.

शक्य आहे; कारण त्यांच्यांत असें कांहीं तत्त्व आहे कीं, तें त्याच्याशीं निगडितपणें एकरूप आहे किंवा कमींतकमी निगडितपणें एका दिव्य सत्तेशीं तें संबंधित तरी आहेच. भारतीय धर्माचें सार अशा एका विकासांत किंवा जीवनांत आहे कीं, ज्यामुळें आपल्या मनापासून आणि जीवनापासून आत्मज्ञान गूढ ठेवणाऱ्या अज्ञानांतून आपण प्रगत होऊं आणि आपल्या आंतरस्थ ईश्वरत्वाविषयीं जागृत होऊं शकूं. याच एकत्रित केलेल्या तीन गोष्टी म्हणजे हिंदुधर्माचें सार-सर्वस्व आहे, त्याचा सारभूत भाग आहे आणि जर सांप्रदायाची वा 'विश्वासाची' जरुरीच असेल तर हाच तो सांप्रदाय व विश्वास आहे.

——श्रीअरविन्द.

(Foundations of Indian Culture मधून)

# तारुण्य

आयुष्याच्या वसंतकालांतील किती वर्षें मनुष्यानें घालविलीं आहेत यावर त्याचें तारुण्य अवलंबून नाहीं, तर विकास आणि प्रगति करून घेण्याच्या त्याच्या शक्तीवर तें अवलंबून आहे. विकास म्हणजे आमच्यांतील सुप्त संभाव्यता आणि कार्यक्षमता यांची वाढ; आणि अंगीं असलेल्याच शक्ती अखंड अविरतपणें परिपूर्णतेस नेत रहाणें हीच प्रगति. माणसाला वृद्धावस्था येते याचें कारण त्याचें वय झालें आहे म्हणून नव्हे तर त्याची ही विकसित होण्याची आणि प्रगति करण्याची वृत्ति खुंटते म्हणून; किंवा तो स्वेच्छेनें या शक्तींचा अस्वीकार करतो म्हणून! २० वर्षांचे वृद्ध आणि ७० वर्षांचे तरुण मी पाहिलेले आहेत. मनुष्याला जेव्हां कर्तव्य-मुक्त झाल्याची जाणीव होते, भूतकालीन मिळकतीवर आराम करावासा वाटू लागतो, आयुष्यांत जें कांहीं मिळवावयाचें होतें तें मिळविलें आहे, आतां कोणतीहि इच्छा बाकी नाहीं असें वाटूं लागतें आणि कृतकृत्यतेच्या भावनेनें मनुष्य जेव्हां आपली प्रवृत्ति थांबवितो, आपल्या व्यवसायाची आवराआवर करूं लागतो—थोडक्यांत म्हणजे मनुष्य जेव्हां प्रगति करावयाची थांबतो किंवा पूर्णत्वाच्या मार्गावर पुढेंपुढें वाटचाल करीत नाहीं, त्यावेळीं तो निश्चित मागें पडूं लागतो——ह्यालाच म्हणतात वृद्धत्व.

शरीराबद्दलहि ही एक गोष्ट शिकण्यासारखी आहे कीं, अचूक पद्धति आणि योग्य व अनुकूल परिस्थिति शोधून काढल्यास आमच्या शरीर-संपदेची वाढ आणि प्रगति अगदीं अमर्यादपणें होऊं शकते.

आम्ही जे प्रयोग येथें करूं इच्छित आहोंत, त्यापैकीं हा एक प्रयोग आहे कीं, मानवी शक्ती मर्यादित नाहींत, त्यांची कल्पनातीत वाढ होऊं शकते, हें जगाच्या निदर्शनास आणून देऊन, या विरुद्ध जी सार्वत्रिक व सामूहिक धारणा आहे, ती मोडून टाकावयाची.

२ फेब्रुवारी, १९४९ ——श्रीमाताजी

# वाचकांचे प्रश्न

(वाचकांनीं आपआपले प्रश्न पाठवावेत.)

**प्रश्न—नैमित्तिक उपवास किंवा जप यांसारख्या व्रतांना श्रीअरविंदांच्या पूर्णयोगामध्यें काय स्थान आहे ? पूर्णयोगाची साधना करूं लागल्यानंतर हीं व्रतें सोडून देणें आवश्यक आहे काय ?**

**उत्तरः**—हीं किंवा अशांसारखीं अन्य व्रतें पालन करणें हें धार्मिक जीवनाचें एक अंग असतें; आणि बहुधा या धार्मिक जीवनानें आध्यात्मिक जीवनाची पूर्वतयारी होत असते. प्रकृतीचें शुद्धीकरण करणें, मानसिक शक्ती एकाग्र करून त्या सूक्ष्म करणें वगैरे दृष्टीनें या व्रतांची धार्मिक जीवनामध्यें निश्चित उपयुक्तता असते. आपलें सामान्य दैनंदिन जीवन हें अपूर्ण आहे, आणि अधिक पूर्ण व अधिक उच्चतर उचित असें जीवन जगावयाचें असेल तर अस्तित्वाच्या दुसऱ्या एका प्रकारच्या अवस्थेमध्यें आपण जीवन जगण्याचा प्रयत्न केला पाहिजे, व अशी अवस्था निश्चित अस्तित्वांत आहे, याची आठवण करून देण्यासाठीं, अनेक इतर गोष्टींप्रमाणें हीं व्रतेंहि अत्यंत उपयुक्त आहेत. परंतु ज्यावेळीं आध्यात्मिक जीवन सुरूं होतें, विशेषतः ज्यावेळीं पूर्णयोगाची साधना मनुष्य करूं लागतो त्यावेळीं हीं साधनें आवश्यक रहात नाहींत, तसेंच तीं टाकून दिलीं पाहिजेत असेंहि नाहीं; आपलें साध्य साधण्यासाठीं त्यांचा जो काय थोडाफार उपयोग होत असेल तेवढा त्यांपासून करून घेण्यास कांहींच हरकत नाहीं.

ज्या दिव्य शक्तीला आपण आपलें संपूर्ण समर्पण केलेलें असतें तिच्यावर या योगामध्यें सर्वस्वीं भार टाकावयाचा असतो. साधकाच्या जाणीवेमध्यें प्रथमतः केन्द्रस्थानीं मुख्य बदल घडवून आणण्याचें कार्य हीच शक्ति करीत असते. नंतर याच शक्तीचा प्रभाव वाढत जाऊन त्यामुळें जीवनाच्या सर्व अंगोपांगांचें रूपांतर घडवून आणण्याचें कार्य सुरूं होतें. पूर्णयोगाचें ध्येय साध्य करून घेण्यासाठीं कांहीं अतिमानवी प्रयत्नांची आवश्यकता असल्यामुळें ईशशक्तीचें साह्य घेतल्याशिवाय केवळ मानवी संकल्पशक्तीनें हें कार्य साधणें अशक्य आहे; म्हणूनच या योगामध्यें मार्गदर्शक म्हणून योगशक्तीवर इतका भर दिलेला आहे. त्या दृष्टीनें पाहतां शारीरिक वा मानसिक व्रतांमध्यें मानवी इच्छाशक्तीचा प्रामुख्यानें भाग असल्यामुळें, तिचेंच विशेष साह्य असल्यामुळें, या पूर्णयोगाच्या साधनेंत व्रतें आचरण करण्याची तितकीशी आवश्यकता उरत नाहीं असें म्हटलें. त्यांच्या साह्यानें जें काय प्राप्त होतें तें किंबहुना त्याहूनहि अधिक कार्य ही शक्ति घडवून आणते; अर्थात् साधकाच्या आधारामध्यें त्या शक्तीचा स्वीकार करण्याची व तिच्याप्रत उन्मुख राहण्याची जितकी शक्ति असेल त्या प्रमाणांत ती कार्यकारी होऊं शकते.

★

**प्रश्न—'आत्मा अमर आहे' म्हणजे काय ? तो मृत्यूनंतर कोठें जातो ?**

**उत्तर**—आत्मा हा भगवंताचा एक अंशभाग असतो. भगवंत अमर, म्हणजेच जन्म आणि

मृत्यू यांच्या अतीत असल्यामुळें त्याचा अंश जो आत्मा त्याच्या ठिकाणीं हें अमरत्व साहजिकपणें येतेंच. देहाचा मृत्यु झाल्यानें तो मरत नाहीं. प्रत्येक आत्मा म्हणजे दिव्य चैतन्याच्या अभिव्यक्तीचा एक भाग, एक किरण, त्याचाच आत्म-विस्तार असतो. सृजनकार्यांत भाग घेतां यावा, आणि आद्य भगवच्छक्तीच्या संपूर्ण प्रतिभेमध्यें आपलें हळु हळु अधिकाधिक रूपांतर व्हावें, त्यादृष्टीनें आपला विकास व्हावा म्हणून एका पाठीमागून एक असे अगणित देह हा आत्मा घेतो. त्याच्या वाढीस उपयुक्त अशा विशिष्ट अनुभवांचा संचय करण्यासाठीं तो जन्म घेतो; आयुष्यभर अशी साधनसामग्री गोळा करून झाली म्हणजे तो देह सोडून देतो आणि ह्या मिळविलेल्या अनुभवांतील सारभूत भाग आत्मसात् करून घेण्यासाठीं तो आंतरात्मिक-जगतामध्यें आपल्या विश्रामस्थानीं जातो. विश्रांतीचा हा काळ संपल्यानंतर पुढील अनुभवांसाठीं आत्मा पुनः जन्म घेतो आणि हें चक्र असें चालू रहातें.

अर्थातच भौतिक जड देह सोडल्यानंतर आत्मा थेट या विश्राम-स्थानीं जात नाहीं. आपले सूक्ष्म कोश एकेक सोडीत सोडीत त्याला अस्तित्वाच्या अनेक पातळींवरून जावें लागतें. या पातळींवर तो किती काळ रहातो वा कोणत्या स्वरूपांत त्यास रहावें लागतें हें त्या त्या जन्मांतील संचित कर्मांच्या संस्कारांवर अवलंबून असतें.

★

**प्रश्न—हिटलर, मुसोलिनी, स्टॅलिन यांसारखे लोक दिव्यता-विरोधी शक्तींच्या हातचीं साधनें झाले होते. ते नेहमींच, दुसऱ्या जन्मांतहि, असेच दिव्यता-विमुख राहतात, कां ते भगवंताकडे वळण्याची कांहीं शक्यता असते?**

**उत्तर**—ते कोणत्या कोटींतील जीव होते यावर सर्व कांहीं अवलंबून आहे. जर ते विकासशील जीव असून त्या विशिष्ट अनुभवांची निवड त्यांनीं केलेली असेल, किंवा कांहीं कारणानें ते विरोधी गूढ शक्तींच्या तावडीत जाऊन त्या शक्तींनींच स्वहेतुपूर्तीसाठीं त्यांचा उपयोग करून घेतला असेल तर, ते दुसऱ्या जन्मामध्यें अगदीं वेगळ्या प्रकारच्या अनुभवांची निवड करणें अगदीं सहज शक्य आहे. विविध प्रकारचे अनुभव आपल्या विकसनासाठीं आत्मा निवडीत असतो. एका जन्मांत ज्या प्रकारचे अनुभव मिळाले असतील त्याच्या अगदीं विरुद्ध प्रकारच्या अनुभवांची निवड पुढच्या जन्मामध्यें त्यानें केली तर त्याच्या आड कोणीच येऊं शकत नाहीं.

पण हीं माणसें जर विकसनशील जीव नसून स्थिर कोटींतील, दुसऱ्या जगतांतील जीव असतील आणि या पृथ्वीवरील प्रगमनशील, दिव्य आध्यात्मिक उत्क्रांतीच्या आड येण्यासाठीं किंवा तिला विलंब लावण्यासाठीं जर या जीवांनीं येथें मुद्दाम जन्म घेतला असला तर मात्र गोष्ट निराळी. तरी पण याठिकाणीं सुद्धां, दिव्यशक्तीमुळें त्यांच्यांत पार बदल होऊन त्यांचें रूपांतर होणें शक्यच नाहीं असे नाहीं. पण सामान्यतः ते कायमचे तसेच राहतात व आपल्या विशिष्ट कोटीचा विशेष गुणधर्म टाकूं इच्छित नाहींत.

★

**प्रश्न—मनुष्याचें मन मुळांत शुद्ध असतें व त्याच्या पापांमुळें तें मलिन होतें असें म्हणतात,**

**तें खरें आहे काय ? तसें असेल तर तें पाप नाहींसें करण्यास उपाय काय ?**

**उत्तर**—वास्तविक मुळांत मनुष्याचें मन म्हणजे शुद्ध चैतन्यच. तें निष्कंप आणि स्वयंभू असतें. शुभ्र पडद्यावर ज्याप्रमाणें चित्रपट सरकत राहतो त्याप्रमाणें विचार आणि वृत्ती या मनःपटलावर भ्रमण करीत असतात. मन हें विचार आणि कल्पना यांचें मुळींच बनलेलें नाहीं. मनःक्षेत्रामध्यें त्या बाहेरून येतात व तेथें अनुकूल असा आकार धारण करतात. शिवाय, मनुष्याच्या अस्तित्वाचीं दुसरींहि कांहीं अंगें आहेत. उदाहरणार्थ, त्याचें शरीर, त्याची प्राणशक्ति इत्यादि. अस्तित्वाच्या या दुसऱ्या भागांतूनहि भावना, कामना, वासना या रूपांत कांहीं ऊर्मी उठत असतात, त्या सर्व वर मनापर्यंत येतात व तेथें एक विशिष्ट रूप धारण करतात. ह्या गतिवृत्तींची मनःपटलावर एकसारखी गर्दी होऊन राहिलेली असते. आणि त्यामुळेंच मनाचें स्फटिकवत् रूप झांकोळलें जातें. ज्याला आपण 'पाप' म्हणतो अशाच केवळ वृत्ती या मनःपटलावर आलेल्या असतात असें नव्हे तर त्यामध्यें कांहीं 'पुण्य' वृत्तीहि असतात. कारण वास्तविक पाहतां पाप वा पुण्य असें कांहीं नसतेंच. त्या सर्व प्रकृतीच्या हालचाली असतात, ते सर्व प्रकृतीचे व्यापार असतात. त्यांच्यांतील फरक हा अंशात्मक असतो. कांहीं ओंगळ, ओबडधोबड, स्थूल स्वरूपाच्या असतात, तर कांहीं शुद्ध, नीटस व सूक्ष्म असतात. कशाहि असल्या तरी त्या सत्वरज-तम या त्रिगुणांनीं युक्त असतात व मनाचा स्वच्छ आरसा झांकून टाकण्यास बसलेल्या असतात.

यांतून सुटण्याचा मार्ग म्हणजे त्यांच्या ह्या हालचालींपासून, या व्यापारांपासून स्वतःस अलिप्त राखावयाचें, मनाच्या पृष्ठभागावर त्या चालल्या असल्या तरी त्यांना तेथेंच सोडून आपण चेतनेच्या उच्चतर किंवा गूढतर अशा पातळीवर स्वतःस न्यावयाचें; त्यांच्या आंत शिरावयाचें. अशातऱ्हेनें नित्य अभ्यास करीत गेलें म्हणजे मनाच्या शुद्ध पातळीवर स्थिरावल्याची जाणीव हळुहळु मनुष्याला होऊं लागते, आणि मनाच्या अशा पातळीवर सुस्थिर राहून तेथून सर्व जीवनव्यवहार करणें, तेथून पाप-पुण्य-मुक्त जीवन, त्याला जगणें शक्य होतें.

—रेवान्

---

बद्धकोष्ठाचा विकार अन्नावर अवलंबून नाहीं. बद्धकोष्ठास कारण शारीरिक जडता-तामसिकता-हें असतें. तामसिकता झटकून टाकतांच बद्धकोष्ठाचा उपद्रव दूर होईल.

★

मनाला अन्न हा एक विषय करूं देणें उपयोगी नाहीं. आपल्याला कशाची गरज आहे तें शरीर स्वतःच उत्तम तऱ्हेनें जाणतें. मन व प्राण यांना शांत निःस्तब्ध करा व शरीराला कशाची गरज आहे हें जाणण्याचा अभ्यास करा.

——श्रीअरविंद

★

# साधी रहाणी

(विद्यार्थ्यांसाठीं)

अरब लोकांना उपदेश करण्यांत ज्यांनीं आपलें सारें आयुष्य वेंचलें त्या महंमद पैगंबरांनी सुखविलास किंवा धनदौलत यांची कधींच पर्वा केली नाहीं.

एके दिवशीं रात्रीं एका खरखरीत चटईवर ते झोंपले होते. ते जेव्हां उठले, तेव्हां चटईचे वळ त्यांच्या अंगावर रुपलेले होते. त्यांच्या एका मित्रानें म्हटलें, "महाराज, आपल्या मानानें ही चटई फारच खरबरीत होती, आपण मला बोललां असतां तर आपल्याला उत्तम बिछाना करून देण्यांत मला आनंदच झाला असतां."

महंमद म्हणाले, "मऊ मऊ बिछाना माझ्यासाठीं नाहीं. मला जगांत एक फार मोठें कार्य करावयाचें आहे. भर उन्हाच्या वेळीं झाडाच्या गार सांवलीत घोडेस्वार आपल्या दमलेल्या घोड्याला विसांवा देतो आणि थोड्या वेळानें पुनः दौड सुरूं करतो, तसेंच जेव्हां माझ्या शरीराला विश्रांतीची जरुरी असते, तेव्हां मी ती देतो."

महंमदांना जगामध्यें महान् कार्य करावयाचें होतें. म्हणूनच त्यांचें उदात्त जीवन अगदीं साधें होतें. आपल्या नियोजित कार्यावर त्यांची श्रद्धा होती; साऱ्या अरब जनतेला त्यांना सन्मार्ग दाखवावयाचा होता. चैनीच्या वस्तूंची व सुखसोयींची त्यांनीं कधींच फिकीर बाळगली नाहीं; कारण त्यांचें मन उच्च ध्येयावर खिळलेलें होतें.

★ ★ ★

अरबस्थानांतीलच आणखी एक गोष्ट आहे. मनानें जे निर्मळ, साधेभोळे असतात त्यांना श्रीमंती पक्वान्नापेक्षां साधी मीठभाकरच गोड लागते, साधें जीवन जगण्यांतच त्यांना अधिक आनंद वाटतो. हेंच त्या गोष्टींत दाखविलें आहे.

अरबांची 'काल्ब' नांवाची एक टोळी होती. 'मईसून' ही एका अरबाची मुलगी होती. वाळवंटांतील एका तंबूमध्येंच ती लहानाची मोठी झाली.

वयांत आल्यानंतर खलिफ 'मुआवहाशीं' तिचें लग्न झालें. हजारों गुलाम तो पोसत होता. ऋद्धि सिद्धि त्याच्या घरीं पाणी भरत होत्या. पण तरीहि तो तिला सुखी करूं शकत नव्हता. या ऐन श्रीमंतींतहि मईसूनच्या जिवाला मात्र सुख नव्हतें; तिच्या मनाला कोणतीच गोष्ट शांति देऊं शकत नव्हती. जेव्हां ती एकटीच बसलेली असे, त्यावेळीं तिनें स्वतःच अरबी भाषेंत रचलेलीं गाणीं ती स्वतःशींच गुणगुणत असे.

"या भरजरी झोळापेक्षां उंटाच्या कातडीचा तपकिरी कोट मला फार आवडतो. राजवाड्यांतील या महालापेक्षां वाळवंटांतील तंबू किती सुखकर असतो. पागेमधील सजविलेल्या अवाढव्य अश्वांपेक्षां स्वच्छंदानें बागडणारीं कोंकरें माझ्या मनाला किती रिझवितात. हस्तिदंती शिंगामधून शिपायानें फुंकलेल्या कर्कश ललकारीपेक्षां माझ्या आवडत्या कुत्र्याचें मध्यरात्रींचें भुंकणेंच मला अधिक प्रिय वाटतें"––अशा अर्थाचें एक गाणें ती एकदां म्हणत होती.

खलिफानें तिचें गाणें ऐकलें आणि त्यानें तिला हांकलून दिलें. ती आपल्या जमातींत आनंदानें परत आली. त्या उदास राजवाड्यांत पुनः परत जावें असें तिला कधींच वाटलें नाहीं.

★ ★ ★

श्रीमंती, चैनीचें, भपक्याचें व कृत्रिम जीवन जगण्यापेक्षां साधें, नैसर्गिक जीवनच अधिक स्पृहणीय असतें, असें आज जगांतील कितीतरी लोकांना वाटूं लागलें आहे.

मौल्यवान् वस्तू विकत घेण्यापेक्षां त्याच संपत्तीचा उपयोग आपण एकाद्या सत्कार्याला करावा असा विचार करणाऱ्या श्रीमंत स्त्री पुरुषांची संख्या आजकाल वाढूं लागली आहे. पंचपक्वान्नांचें जड अन्न घेण्यापेक्षां आरोग्यकारक साधे पदार्थ सेवन करणें ते पसंत करूं लागले आहेत; केवळ शोभेच्या, किंमती जिनसांची घरामध्यें गर्दी करून सोडण्यापेक्षां घराची सजावट करतांना सात्त्विक सौंदर्यदृष्टि ते वापरूं लागले आहेत.

ऐतिहासिक काळांत दृष्टिक्षेप टाका म्हणजे तुम्हांला दिसून येईल कीं, मानवजातीच्या प्रगतीसाठीं झटणाऱ्या सर्व थोर व उत्साही कार्यकर्त्या व्यक्ती अतिशय साधें व सात्त्विक जीवन जगत होत्या. त्यामुळेंच त्यांचें शरीर निकोप असें आणि परोपकाराचीं कामें करण्यास त्यांच्या अंगीं सदैव उत्साह व चैतन्य ओतप्रोत भरलेलें असें. त्या त्या काळांत असेहि लोक असत कीं, संपत्तीचा हव्यास धरून अलोट संपत्ति ते सांठवून ठेवीत व शेवटीं नोकरचाकर, दागदागिना, संपत्ति यांचेच ते गुलाम होऊन बसत. अर्थातच साधें जीवन जगणारे साधुसंत पाहिले म्हणजे अशा विलासी लोकांना लाज वाटे.

एका ठिकाणीं ढीग करावयाचा तर दुसऱ्या ठिकाणीं तुम्हाला खड्डा खणावा लागतो; त्याशिवाय चालत नाहीं. त्याचप्रमाणें एकाची चैन किंवा श्रीमंती म्हणजेच अनेकांचें दुर्भिक्ष, किंवा विपत्ति असेंच बहुधा आढळून येतें. खरेंच, आपला वेळ, आपले विचार आणि पैसा क्षुल्लक गोष्टींत खर्चीं घालूं नये असें समजण्याइतकी बुद्धिमत्ता ज्यांना आहे अशा लोकांनीं करण्यासारखीं अनेक उपयुक्त व महान् कार्यें या जगामध्यें आहेत. तीं तुम्हांस करतां येणार नाहींत कां ?

★ ★ ★

संत फ्रान्सिस हा लोकांना साध्या रहाणीची शिकवण देई, उपदेश करी. मात्र पैसा कमविण्याची त्याची दृष्टि नसे. स्वतःच्या वागणुकीनें, आचरणानें भोळ्या भाबड्या लोकांना आदर्श शिक्षण मिळावें ह्या एका गोष्टींतच त्याच्या जीवनाचा महान् आनंद सांठविलेला होता. भोंवतालचे गरीब लोक जें काय खायला प्यायला देतील त्यावरच तो समाधानानें रहावयाचा.

संत फ्रान्सिसचा मॅटो नांवाचा एक मित्र होता. उंच, धिप्पाड व देखणा. फ्रान्सिस मात्र वामनमूर्ति व साधासुधा. एकदां दोघे एका खेडेगांवांतून हिंडत होते. मॅटोला चांगलीच कमाई झाली, पण फ्रान्सिसला मात्र लोकांनीं फारच थोडी भिक्षा दिली.

वेशीवर पुन्हां दोघांची गांठ पडली. जवळच लहानसा ओढा खळखळत वहात होता.

त्याच्याकडेलाच एका मोठ्या पारावर दोघे बसले; आपआपली झोळी सोडून दोघांनीं मिळालेलें अन्न एकत्र केलें.

"अरे, आज चांगलीच मेजवानी झाली आहे कीं!" मोठ्या आनंदानें फ्रान्सिस उद्‍गारला.

"हूं, पण हे भाकरीचे साधे तुकडे, यांत कसली मेजवानी! येथें काय ताटपाट, रांगोळ्या, उदबत्त्या आहेत, कीं वाढायला कोणी आचारी आहेत?"—मॅटो म्हणूं लागला.

"कां, याला तूं मेजवानी नाहीं म्हणणार?" अरे, चांगली भूक लागली असतांना पोटभर भाकरी आणि तहान लागली असतांना झुळझुळत्या झऱ्याचें स्वच्छ, थंडगार पाणी प्यायला असल्यानंतर आणखी काय पाहिजे?"—फ्रान्सिसनें विचारलें.

गरीबांनीं आपलें कसेंबसें पोटापुरतें मिळवावें आणि नेहमींच गरीबींत रहावें असा याचा अर्थ नाहीं. पण बाह्य साधनाचें दुर्भिक्ष्य असूनहि, जवळ संपत्ति नसतांहि, आंतरिक संतोषानें व प्रसन्न मनानें गरीबीचाच उपयोग चांगल्या रीतीनें कसा करून घेतां येतो हें मात्र फ्रान्सिसच्या उदाहरणावरून आपल्याला पाहतां येईल. आंतरिक समाधान आणि प्रसन्नता हीच संपत्ति असे पुण्यात्मे जन्मतःच आपल्याबरोबर घेऊन आलेले असतात.

★ ★ ★

एक गोष्ट मात्र निश्चित कीं, साधेपणामुळें आजवर कोणासच इजा पोंचलेली नाहीं. उलट चैनीच्या व श्रीमंती जीवनाविषयीं असा निर्वाळा देणें मात्र कठीण आहे. पुष्कळवेळां असें होतें कीं, ज्या गोष्टींची मनुष्याला खरोखरीच गरज नसते त्याच नेमक्या गोष्टी त्याला जास्तीत जास्त इजा देणाऱ्या ठरतात.

अकबर बादशहाच्या कारकीर्दींत आग्ऱ्यामध्यें बनारसी दास नांवाचा एक जैन साधू रहात असे. बादशहानें एकदां त्याला राजवाड्यांत बोलावून म्हटलें, "तुम्हांला जें काय हवें असेल तें मला मागा. तुमची इच्छा मी पूर्ण करीन. कारण तुम्ही अतिशय साधुवृत्तीचे आहांत."

" जें कांहीं मला आवश्यक असणें शक्य आहे त्यापेक्षां अधिकच परब्रह्मानें मला दिलें आहे"—साधूनें उत्तर दिलें.

"तरी सुद्धां, आपण कांहीं तरी मागाच"—अकबरानें अधिकच आग्रह केला.

"तसे असेल तर मग, हे राजा, मी येवढेंच मागतो कीं, या नंतर पुन्हां तूं मला बोलावूं नकोस. कारण देवानें मला दिलेल्या कामांत मी सर्व वेळ द्यावा अशी माझी इच्छा असते."

"तर मग मी तसेंच करीन" अकबर म्हणाला, "पण मला मात्र कृपा करून तुमच्या जवळून कांहीं मागूं द्याल कां?"

"राजा, बोल काय पाहिजे?"

"मीं नेहमींच मनांत बागवून त्याप्रमाणें वागावें असा कांहीं उपदेश मला आपण कराल कां?"

क्षणभर विचार करून बनारसीदास म्हणाले, "तुझें अन्न शुद्ध व पौष्टिक असेल असें पहा आणि मांसाहार, दारू वगैरे पेयें यांची विशेषतः रात्रीं तूं चांगली काळजी घे."

"मी तुमचा उपदेश विसरणार नाहीं," बादशहानें म्हटलें.

खरोखरीच हा उपदेश चांगला होता; कारण खाण्यापिण्याच्या बाबतींत चांगल्या संवयीं ठेवल्यानें योग्य आरोग्यसंपन्न असें शरीर लाभतें.

शुद्ध व पवित्र असें मन आणि जीवन या देहमंदिरांत नांदूं लागतें.

ज्या दिवशीं त्या साधूनें राजवाड्यांत बादशहाला उपदेश केला तो दिवस उपवासाचा होता. त्यामुळें मध्यरात्रीनंतर, कित्येक तासांनीं बादशहास अन्न घ्यावयाचें होतें. तेव्हां राजाच्या स्वयंपाक्यांनीं त्याचें अन्न सायंकाळींच तयार करून तें सोन्याचांदीच्या ताटांत भरून ठेवलें होतें, आणि उपवास सोडण्याच्या वेळेची प्रतीक्षा करीत ते बसले होते.

जेव्हां त्या ताटांतील अन्न घ्यावयास अकबर बसला तेव्हां अजून अंधारच होता. दिवसभराच्या उपासानंतर अन्न घेण्यासाठीं त्याला घाई झाली होती. पण त्याच क्षणीं, 'तुझ्या अन्नाची व पेयांची चांगली काळजी घे,' असें बनारसीदास या साधूनें सांगितल्याचें बादशहास स्मरण झालें. त्याप्रमाणें समोर ठेवलेल्या ताटांकडे तो निरखून पाहूं लागला. तेव्हां ताट तांबड्या मुंग्यानीं भरून गेलेलें त्याला दिसलें. काळजी घेऊन सुद्धां ताटांतल्या अन्नांत शिरून मुंग्यांनीं सर्व अन्न खराब करून टाकलें होतें.

अकबरानें त्या ताटांतील अन्न टाकून दिलें. पण या प्रसंगानें बनारसीदासांचा उपदेश त्याच्या मनावर अधिक खोल कोरला जाऊन त्याचें मोल त्याला अधिक चांगलें समजलें.

तांबड्या मुंग्या त्यानें पहाव्या येवढ्याचसाठीं केवळ बनारसीदासानें अकबरास तसें सांगितलेलें नव्हतें. तर त्याच्या शरीराच्या व मनाच्या आरोग्यास बाधक असें कांहींहि त्याच्या अन्नांतून जाऊं नये म्हणून त्यानें बादशहास तसा उपदेश केला होता.

अशुद्ध अन्नामुळेंच पुष्कळसे आजार आपणांस होतात. खाण्याचे पदार्थ वाईट आहेत हे माहीत असूनहि ते जो विकतो तो एक प्रकारें आपल्या नागरिक बंधूंच्या जीवितास हानी पोंचविण्याचा गुन्हा करतो असें वास्तविक म्हणतां येईल. पदार्थ खराब झाले म्हणजेच केवळ ते 'वाईट' अथवा 'अशुद्ध' झाले असें नव्हे; तर कोणत्याहि कारणानें अन्न शरीर-मनास बाधक झालें तरी तें 'वाईट'च म्हणावें लागतें.

★ ★ ★

कांचेच्या पेल्यांतहि पुढें कधीं तांबड्या मुंग्या अकबरास सांपडल्याचें इतिहासांत नमूद झालेलें नाहीं. तरीपण पेयासंबधींहि काळजी घेण्यास बनारसीदासानें त्यास सांगून ठेवलें होतें.

कारण डोळ्याला आकर्षित करणाऱ्या चकचकीत कांचेच्या पेल्यांपैकीं कांहींत, मनाला उत्तेजित व प्रसन्न करणारे पण शरीराला अपाय व धोका करणारें पेय, म्हणजेच दारू ठेवलेली असते.

पैगंबर महंमद यानें तर जुगार खेळणें व दारू पिणें या दोन गोष्टींची गणना पापकृत्यांतच केली आहे, आणि कुराणांतील वचनाविषयीं ज्यांना आदर वाटतो ते या दोन्ही पापांपासून दूर राहून एक प्रकारें लाभ करून घेतात.

परंतु सर्व जगभर चांगलीं सभ्य समजलीं जाणारीं कित्येक माणसें आहेत, ज्यांना

दारूसारखीं पेयें पिण्यांत कांहीं गैर आहे, वा अपायकारक आहे असें वाटतहि नाहीं. अशा लोकांच्या मतांना योग्य तो मान आम्ही देतो; तरीपण दारू न पिणें ही चूक आहे असें तेहि म्हणूं शकत नाहींत.

जर कांहीं लोकांचें मत, दारू पिणें चूक आहे, असें आहे तर असेहि कांहीं लोक आहेत, ज्यांच्या मतें दारू पिण्यांत धोका नाहीं. परंतु निदान, दारू पिणें हीच चूक आहे, असें म्हणणारा एकहि माणूस नाहीं हें स्पष्ट आहे. दारूचा उपयोग व तोटे यावर उलट सुलट पुष्कळच वाद चालणें शक्य आहे; परंतु दारू न पिण्यांत धोका आहे असें म्हणण्यास मात्र कोणी धजणार नाहीं, आणि कसेंहि असलें तरी दारू सोडणें ही गोष्ट आर्थिक दृष्ट्या फायद्याची आहे याबद्दल मात्र सर्वांचें एकमतच होईल.

प्रत्येक देशांत, दारूवर संयम व संपूर्ण बहिष्कार घालण्यासाठीं संघटित होऊन प्रयत्न करणाऱ्या संस्था सर्वत्र दिसतात. या संस्थांच्या सभासदांनीं स्वतः दारूस स्पर्शहि न करण्याचें बंधन घेतलेलें असतें. कांहीं शहरांत दारू विकण्यासहि बंदी घातलेली असते.

उलट, कांहीं ठिकाणीं, जेथें पूर्वी दारू माहीतहि नव्हती तेथें आतां त्याचा प्रसार होण्यास प्रारंभ झाला आहे. उदाहरणार्थ, हिंदुस्थानांत संयमाचा दंडक शतकानुशतकें चालूं होता; तेथेंच आतां दारूला आंत शिरण्यास वाट मिळाली आहे. पुराणांतरीं वर्णन केलेल्या राक्षसापेक्षां अधिक भयानक राक्षसीला प्रवेश मिळाला आहे. पुराणांतरीं वर्णिलेल्या राक्षसांना शरीरालाच इजा करण्याचें फक्त सामर्थ्य होतें, तर उलट ही दारू मनुष्याची विचारशक्ति मृतवत् करून टाकते व एकंदर चारित्र्याची धूळधाण करते.

ज्यांना दारूचें व्यसन आहे त्यांच्या शरीरावर प्रथम अनिष्ट परिणाम होतो व त्यांच्या मुलाबाळांनाहि इजा पोंचते. शिवाय व्यसनाच्या नादीं लागल्यानें त्यांची बुद्धि भ्रष्ट होते व आपआपल्या योग्यतेनुसार मानवजातीची सेवा करण्याऐवजीं ते लोक व्यसनाचे गुलाम बनून जातात.

आपल्या खाण्यापिण्यामुळें आपण आपल्या शरीर-मनाची नासाडी करून घेतली तर आपलें कर्तव्य-कर्म करण्यास अपात्र असे गुलाम आपण बनून जाऊ, दुसरें कांहीं नाहीं.

हातचें शस्त्र मोडून पडल्यावर सैनिकाला, शिडाशिवाय नाव चालविणाऱ्या नावाड्याला आणि घोडा लंगडूं लागलेल्या घोडेस्वाराला पुढें कोणती गति हें काय सांगावयला हवें? तसेंच, मनुष्याजवळच्या मौल्यवान् शक्तीच नष्ट झाल्या तर तो कांहीं तरी करूं शकेल काय?

मग तो आणि जनावर दोघे सारख्याच दर्जाचे असें सुद्धां म्हणतां येणार नाहीं; कारण जनावर निदान त्याला अपायकारक असलेलें खाद्य व पेय तरी घेत नाहीं.

व्हर्जिल हा रोमन कवि. खेडेगांवात रहाणें त्याला आवडे. बैलांची तो फार तारीफ करी. कारण बैल हा बलवान् असून नांगर ओढतो आणि नांगरलेली भूमी पिकानें फुलून जाते. त्याची शरीरयष्टि धष्टपुष्ट व स्नायु बलवान् असतात; आणि वर्षानुवर्षें एकसारखा तो काम करीत असतो.

व्हर्जिल म्हणतो, "पहा, भरघोंस धान्याचीं कणसें व द्राक्षवेली त्याच्या नाहींत; तो गवतावरच पोसला जातो. झऱ्याचें वा ओढ्याचें खळखळतें पाणीच तो पितो. त्याची गाढ झोंप कोणत्याच काळजीमुळें कधीं चावळली जात नाही."

तुम्हांला बलसंपन्न व्हावयाचें असेल तर तुम्ही तुमच्या खाण्यापिण्याविषयीं संयमी असलें पाहिजे.

कोणी तुम्हांला म्हटलें, "तुम्ही अशक्त व दुबळे व्हाल." तर तुम्हांला निश्चितच राग येईल, नाहीं का ?

खाण्यापिण्यामध्यें संयम राखल्यानें बलवानाचें बल वाढतें व अशक्ताची शक्ति कायम राहूं शकते.

साधु वाराणसीदासाचा उपदेश सतत मनांत ठेवा——

"तुमच्या भोजनपात्राची चांगली काळजी घ्या,
तुमच्या पेयपात्राची चांगली काळजी घ्या."

——श्रीमाताजी

CWMCE Vol 02 : Page 198

---

मुळींच नाहीं. दुर्बल प्राणतत्त्वाला, बलहीनाला आध्यात्मिकतेकडे वळण्याचें सामर्थ्यच नसतें——आणि या दौर्बल्यामुळेंच तो अनिष्ट प्रभावांत सहजीं सांपडूं शकतो व स्वतःच्या संवयींच्या उलट असलेल्या कसल्याच उच्चतर गोष्टी, इच्छा असूनहि ग्रहण करण्यास तो अपात्र ठरतो. जर संकल्पाचें बळ असेल तर बलवान् प्राणशक्तिसंपन्न व्यक्ति हें काम अधिक सुकरतेनें करूं शकते——पण अहंकाराचा ताठा व स्व-सामर्थ्य दाखविण्याची ओढ हा त्याचा मुख्य अडथळा असतो.

प्राणापेक्षां आंतरात्म्याचा संबंध छातीशीं अधिक जवळचा असतो. ज्याची प्राणशक्ति बलिष्ठ आहे, त्याचें शरीर धष्टपुष्ट असूं शकेलहि; पण पुष्कळवेळां शरीरसंपत्ति नसते याला कारण बलिष्ठ प्राणशक्तीमुळें त्या शरीरावर इतका ताण बसतो कीं जणुं ती त्याला खाऊन टाकते.

SABCL : Vol 22 : Page 344

★

१ अहंकार राहित्य—— सर्व तऱ्हेची ( आध्यात्मिक सुद्धां ) महत्त्वाकांक्षा, गर्व, वासना आणि मनांत, विचारांत व आचारांत प्रतिबिंबित होणारें स्व-केंद्रित जीवन या सर्वांचा निरास झाला पाहिजे.

२ जाणीवेची विश्वव्यापी विशालता हवी.

३ सर्वातीत परमेश्वराच्या चरणीं निःशेषतया सर्वसमर्पण हवें.

★

——श्रीअरविंद

# दिव्य जीवन

( क्रमशः )

या नव्या जाणिवेच्या स्थितींत, आजचा मानवी जाणिवेचा आणि जीवनाचा नियम टाकला जाऊन त्याच्या बरोबर उलटा नियम लागू होईल; कारण अज्ञान ( अर्धवट ज्ञान ) हें आजच्या जीवनाचा पाया व आधार आहे आणि नवी जाणीव पूर्णज्ञानाची, आत्मज्ञानाची. तेव्हां जुन्या जीवनाचें जें तत्त्व अज्ञान ( अर्धवट ज्ञान ) त्याच्या उलट नव्या जीवनाचें तत्त्व (आत्मज्ञान, पूर्णज्ञान) असणार. पूर्णज्ञानस्वरूप आत्मा अगदीं खालीं उतरून जडाचा वेष घेतां झाला, पूर्ण अज्ञानांत शिरला; तेथून अल्प, अर्धवट ज्ञानाच्या क्षेत्रांत चढून आला आणि आतां आणखी वर चढून स्वतःच्या मूळ पूर्णज्ञानाच्या क्षेत्रांत येऊं पहात आहे. तो जो खालीं उतरला तो निर्भेळ अज्ञानाची व अल्प, अर्धवट ज्ञानाची चव पाहण्याकरितां उतरला असें म्हणतां येतें.––या खालच्या क्षेत्रांत जी काय नवी नवलाई असेल, जें काय शक्य साहस असेल त्याचा अनुभव घेण्यासाठीं आत्मा त्या क्षेत्रांत उतरला आहे असें मानावयास व म्हणावयास हरकत नाहीं. येथें नवनिर्मितीचें साहस करतां येतें, नवीन शोध लावण्याचें साहस करतां येतें आणि या क्रियांतील आनंद भोगावयास मिळतो.––प्रथम आत्मा स्वतः स्व-स्वरूपांत–जडांत खेळण्याचें, नंतर मन-प्राण निर्मितीचें साहस करतो. जडाच्या क्षेत्रांत मन, प्राण आणि स्वतः काम करीत असतां अनेक चमत्कार, अनेक उत्पाती चमत्कार घडतात; हें घडविण्यांत आनंद आहे, पाहण्यांत आनंद आहे; नवीनाचा, अज्ञाताचा शोध करणें, या शोधांत यश मिळवून नवीनावर व अज्ञानावर आपलें स्वामित्व स्थापणें, या सर्व कार्य-क्रमांत साहस आहे, साहसी जीवनाचा आनंद आहे. अज्ञान ( अल्प, अर्धवट ज्ञान ) पूर्ण ज्ञानांत विलीन झालें कीं, हें सर्व अज्ञाननिष्ठ आनंदमय साहस लयास जाणार आणि म्हणून सर्व आनंदहि लय पावणार असें वाटणें साहजिक आहे. मानवी जीवनांत प्रकाश-अंधकार, लाभ-हानि, अडचणी, धोके, सुखें-दुःखें आहेत––हा अज्ञानाचा बहुरंगी खेळ आहे. हा जडाच्या भूमीवर खेळला जात आहे. जडाची भूमी ही येथून-तेथून तटस्थ भूमि ( Neatrality ) आहे. या भूमीचा, या तटस्थतेचा पाया, पूर्ण नेणीव–संवेदनेचा पूर्ण अभाव हा आहे. जडवस्तूच्या स्थितीहून जीवयुक्त, प्राणयुक्त वस्तूची स्थिति निराळी आहे. सामान्य जीवाला तटस्थता किंवा एकरंगी जीवन मानवणें अशक्य आहे. त्याला विविध-ता आवडते. यश आणि अपयश, वासनेचा आनंद आणि उद्वेग, संकट आणि प्रक्षोभ, सुख आणि दुखः, दैवाचे अनिश्चित फेरे आणि उलटेसुलटे वारे, झगडे, लढाया, खटपटी आणि त्यांतील उलटसुलट व संशयपूर्ण अवस्था, नवीन, आश्चर्यकारक गोष्ट केल्याचा आणि नव-निर्मितीचा आनंद, अज्ञानांत उडी घेण्याचा आनंद हें त्याला आवडतें आणि हा विशिष्ट खेळ ज्या जीवनांत नसेल तें जीवन विविधताशून्य, अतएव नीरस असलें पाहिजे, असेंच सामान्य

जीवाला वाटण्याचा संभव असतो. या जीवाला वरील गोष्टींच्या अतीत गेलेलें जीवन रितें रितें भकास, वैशिष्ट्यहीन, नेहमींच एकसारखे, त्यांत कोठेंहि एवढासाहि बदल नसलेलें आणि म्हणून कंटाळवाणें वाटण्याची शक्यता असतें. मानवी मन स्वर्गाचें चित्र रंगवितें त्यांत एकच एक राग सदासर्वदा तीनत्रिकाळ, खंड न पडतां पुनःपुनः घोळविला जातो; आणि हीच कल्पना अतिमानस अतिमानवी जीवनाच्या बाबतींत गृहीत धरली जाते. परंतु ही कल्पना वस्तुस्थितीस धरून नाहीं, खोटी आहे. कारण, अतिमानस जाणिवेच्या क्षेत्रांत प्रवेश होणें हें अनंतांत प्रवेश होणें आहे. अनंताच्या क्षेत्रांत अनंत हें स्वतःच्या अभिव्यक्तीसाठीं स्वतःची साकार निर्मिति करतें, ती निर्मिति अर्थात् अनंत असते; अस्तित्वाचीं अनंत रूपें धारण करून अनंत आपल्या खास क्षेत्रांत खेळत असतें. अर्थात् अनंताच्या क्षेत्रांत सांतांच्या क्षेत्राहून अधिक आकर्षण असतें. कितीतरी अधिक आणि अधिक विविधतेचें आकर्षण असतें; आणि या अनंत आकर्षणाचा आनंद, सांतांतील आनंदापेक्षां कितीतरी अधिक आकर्षणाचा असून शाश्वत स्वरूपाचा असतो. अज्ञानाच्या क्षेत्रांत क्रमविकास असतो त्याप्रमाणें या ज्ञानाच्या क्षेत्रांतहि क्रमविकास असतो. अज्ञानसंपादित विकासापेक्षां ज्ञानसंपादित विकास कितीतरी अधिक आकर्षक असेल ! अनंताच्या अभिव्यक्तीचीं जीं दृश्यें हा विकास आमच्यासमोर उभीं करील तीं कितीतरी अधिक सुंदर, वैभवशाली आणि भरघोस असतील ! आणि या सुंदर दृश्यांचे देखावे कधींच कमी पडणार नाहींत. एकामागून एक, खंड न पडतां, सारखे सतत हे देखावे आमच्या दृष्टीपुढें येत राहतील. अज्ञानक्षेत्रांतील विकासापेक्षां ज्ञानक्षेत्रांतील विकास सर्व दिशांनीं, सर्व प्रकारें अधिक भरदार, बहारदार असेल. अज्ञानभूमींतील कोण-ताहि विकास इतका सुंदर, इतका वैभवशाली, इतका भरदार, बहारदार असूंच शकणार नाहीं. आत्म्याचा आनंद सदा नवीन असतो. तो जीं सुंदर रूपें धारण करतो त्यांची गणती करतां येत नाहीं, तो नित्य युवावस्था भोगणारा देव आहे; तो अनंत आहे आणि त्याचा आनंदास्वाद अनंत, अक्षय आहे. अज्ञान-भूमीवर नवनिर्मितीचें आकर्षण असतें, नवीन आवि-ष्काराची मौज असते; पण या आकर्षणापेक्षां, या मौजेपेक्षां कितीतरी अधिक भरीव आणि बहारीची मौज आणि आकर्षण विज्ञानभूमीवरील जीवनाच्या आविष्कारांत असतें. येथील प्रत्येक आविष्कार हा अधिक पूर्ण, अधिक परिणामकारक, अधिक भव्य, अधिक आनंद देणारा असा अखंड चमत्कार असेल.

जड भौतिक प्रकृतीच्या क्षेत्रांत जर क्रमविकास होत असेल आणि हा क्रमविकास अस्तित्वाचा होत असून या अस्तित्वाच्या अंगभूत अशा दोन प्रमुख शक्ती जाणीव आणि जीवन या असतील, तर वर उल्लेखिलेलें विज्ञानभूमीवरील पूर्ण अस्तित्व, पूर्ण जाणीव, पूर्ण जीवन हें अस्तित्वाच्या क्रमविकासाचें अंतिम साध्य असलें पाहिजे. आमची वाटचाल त्या साध्याच्या दिशेनें होत असली पाहिजे. तें साध्य आमच्या अस्तित्वाचें नियत भवितव्य असल्यानें, आम्ही आमची नियतीची वाट चालत असतां कोणत्या तरी, जवळच्या किंवा दूरच्या टप्प्यावर तें साध्य वास्तवांत आलें पाहिजे, व्यक्त झालें पाहिजे, आपल्या पदरीं पडलें पाहिजे. जडाचा आणि जीवनाचा पसारा विकासाच्या पूर्वकाळी नेणिवेनें भरलेला होता.

या आद्य नेणिवेच्या, अचेतनतेच्या पसाऱ्यांत, त्याच्या पोटीं असलेलें एकच एक सत्त्व, आत्मतत्त्व, सत्य वर डोकें काढूं लागलें, विकास पावूं लागलें, स्वतःचा आविष्कार करूं लागलें. त्याचा तो आविष्कार क्रमविकास-मार्गानें क्रमशः चालूं आहे, अर्थात् त्या सत्याला, आत्मतत्त्वाला त्या जडाच्या जीवनाच्या पसाऱ्यांत आपल्या अस्तित्वाचें आणि जाणिवेचें जें पूर्ण व समग्र वास्तवरूप विकसित करणें आहे, प्रकट करणें आहे तें, तें आत्मतत्त्व विकसित करील, प्रकट करील आणि या रीतीनें तें आत्मतत्त्व स्वतःकडे परत येईल. अनंत व्यक्ति झालेल्या आत्मतत्त्वाला एकाद्या व्यक्तीच्या ठिकाणीं असें साध्य सुचलें कीं आपण आपल्या मूळ केवलांत, परब्रह्मात परत जावें, त्यांत विलीन व्हावें, तर त्या व्यक्तीला तसें करतां येईल, त्या व्यक्तींतील आत्मतत्त्व तसें करील. मात्र परब्रह्माकडे वळण्यापूर्वी जीवनांत स्वतःची आध्यात्मिक पूर्णता तें प्राप्त करून घेईल. या पूर्णतेच्या मार्गानें तें परब्रह्माकडे वळून प्रविष्ट होईल–जीवन वैफल्याच्या मार्गानें नव्हे. आमच्या ऊर्ध्वमुख क्रमविकासाच्या दोन प्रमुख अवस्था, भूमिका किंवा भूमी आहेत. पहिली म्हणजे खालची भूमि, अज्ञानभूमि. दुसरी म्हणजे वरची, विज्ञानभूमि. (विज्ञानभूमि म्हणजे अतिमानस भूमि. अज्ञानभूमि म्हणजे अर्धवट ज्ञानाची भूमि. ही भूमि विज्ञानभूमीच्या खालची असल्यानें हिला अविज्ञानभूमि म्हणतां येईल. अविज्ञानभूमींत विज्ञानेतर ज्ञान भरपूर असतें. विज्ञानेतर ज्ञानाला अज्ञान हें नांव देतात. ) अज्ञानभूमींत आमचा जो विकास चालतो त्यांत आत्मशोध आणि विश्वशोध करतांना नाना प्रकारचीं सुखदुःखें आमच्या वांटचाला येतात. आमचे प्रयत्न अर्धे सफल, अर्धे निष्फल होत असतात. एकादी गोष्ट मिळते एकादी मिळत नाहीं, असें सारखें होत असतें. लाभ-हानि, लाभ-हानि असें चक्र सतत चालूं असतें. या प्रकारचा विकास अज्ञानभूमींत चालतो. ही आमच्या विकासाची पहिली अवस्था आहे. यानंतर अनिवार्यपणें या अवस्थेंतूनच दुसरी वरची विज्ञानभूमींतील विकासाची अवस्था उदय पावेल. वस्तुजाताच्या पोटीं असलेला दिव्य आत्मा आणि त्याची खरी प्राकृतिक शक्ति म्हणजे पराप्रकृति ( आमच्या सध्यांच्या प्रकृतीच्या पलीकडे म्हणून परा-प्रकृति म्हटलें ) या अवस्थेंत काम करतील. परा-प्रकृतीच्या साह्यानें आपलीं अनंत अव्यक्त रूपें अनेक प्रकारे व्यक्त करण्याचें, आविष्कृत करण्याचें आणि व्यक्ताच्या क्षेत्रांत अनंत रूपांत आत्मदर्शनाचें काम आत्मा या विज्ञानभूमींतील विकासक्रमांत करीत राहील.

—श्रीअरविंद.

(समाप्त)

# आंतरात्म्याचें उद्घाटन

**प्रश्न**–हृदयाच्या अगाध शांतीमध्यें एक ज्योत तेवत असते असें एके ठिकाणीं श्रीमाताजींनीं म्हटलें आहे. ही ज्योत म्हणजेच 'आंतरात्मा' कां ?

**उत्तर**–ही ज्योत म्हणजे प्रत्यक्ष आत्मा नव्हे तो एक आत्म्याचा स्फुल्लिंग आहे. ती एक अभीप्सेची प्रखर स्थिति आहे.

**प्रश्न**–चैत्य पुरुषाचें (Psychic Being) स्थान कोणतें ?

**उत्तर**–त्याचें स्थान हृदयाच्या मागील बाजूस, आंत खोल आहे.

**प्रश्न**–श्रीमाताजी कधीं कधीं म्हणतात कीं, एखाद्या व्यक्तीचा चैत्य-पुरुष–आंतरात्मा, चांगला आहे. पण खरें म्हणजे आंतरात्मा हा भगवंताचाच अंश असल्यानें नेहमीं चांगलाच असणार, नव्हे काय ? मग श्रीमाताजी कांहीं विशिष्ट व्यक्तींच्या बाबतींत असा वेगळेपणा कां दर्शवितात ?

**उत्तर**–कारण चैत्य पुरुष विकास पावत असतो; कांहीं व्यक्तींच्या ठिकाणीं मानसिक आणि प्राणिक विरोध सहज बाजूला सारण्याइतपत त्याचें सामर्थ्य असतें. तर कांहींच्या बाबतींत चैत्यपुरुष कमी विकसित असतो व त्यांना विरोध दूर करण्यास अधिक कठीण पडतें.

**प्रश्न**–योगशक्ति प्रथम आंतरात्म्यामधून येऊन मग मनांत जलद रीतीनें बदल घडवून आणते, असें नव्हे काय ?

**उत्तर**–असें घडतेंच असें नाहीं. मनामध्यें जी शक्ति कार्य करीत असते, तिच्यापासूनच बहुतेक लोक आरंभ करतात; मन व प्राण यांच्यांत कांहीं मर्यादिपर्यंत बदल झाल्यानंतरच आंतरात्मा पुढें येण्याची सिद्धता होते.

**प्रश्न**–मनोमय अस्तित्व, प्राणमय अस्तित्व आणि शारीर अस्तित्व यांच्या साह्यावांचून चैत्य-पुरुषाला स्वतःला प्रत्यक्षपणें प्रकट होतां येतें काय ?

**उत्तर**–मन, प्राण आणि शरीर हीं प्रकटीकरणाचीं साधनें होत. तसेंच हेंहि खरेंच कीं, आंतरात्म्याच्या स्वतःच्या पातळीवर त्याला स्वतंत्रपणें कांहीं गोष्टी प्रकट करतां येतात; पण भौतिक जड पातळीवर वरील साधनांची आवश्यकता असते.

**प्रश्न**–मन व प्राण यांच्यामध्यें बदल घडवून न आणतां चैत्य-पुरुषास पुढें आणणें शक्य नसतें काय ?

**उत्तर**–नाहीं. मन आणि प्राण यांच्यामध्यें जर कांहींच बदल झाला नसेल तर तीं चैत्य-पुरुष पुढें येण्याच्या मार्गांत आड येतात.

**प्रश्न**–"आध्यात्मिक चेतना" आणि "आंतरिक चेतना" यांत फरक काय ?

**उत्तर**–"आध्यात्मिक चेतना" म्हणजे मनापलीकडील उच्च स्तरावरील चेतना. "आत्मा' किंवा चैतन्य हें नित्य भगवंताशीं एकरूप असतें. आध्यात्मिक चेतना म्हणजे नित्य एकत्व पावलेली किंवा निदान भगवंताचा स्पर्श झालेली चेतना.

आंतरात्मा, चैत्य-पुरुष म्हणजे भगवंताचा एक स्फुल्लिंग. तो सर्व वस्तुजातांत वास करतो आणि व्यक्ति जसजशी विकास पावते तसतसा तोहि विकास पावतो आणि नित्य भगवन्ताच्या व सत्याच्या शोधांत राहणारा, आणि जेथें जेथें, जेव्हां जेव्हां भगवंताशीं आणि सत्याशीं गांठ पडते त्या त्या वेळीं आणि त्या त्या ठिकाणीं भगवंताशीं आणि सत्याशीं प्रतिसाद करणारा चैत्य-पुरुष, व्यक्तिगत आत्मा––अशा स्वरूपांत त्या स्फुल्लिंगाचें प्रकटीकरण होत असतें.

**प्रश्न**–'भगवान्' व 'चैतन्य' यांत फरक काय ?

**उत्तर**–भगवन्ताचें वास्तव्य सर्वत्र आहे, अज्ञानांत देखील आहे. भगवान् म्हणजे केवळ आत्मा किंवा चैतन्य नव्हे; मन, प्राण, व शरीर यांमध्येंहि भगवंत आहे. मन, प्राण व शरीर यांच्यामागें ज्याचें अधिष्ठान असतें तो आत्मा, किंवा चैतन्य.

**प्रश्न**–आंतरात्म्याच्या–चैत्यपुरुषाच्या अनेक पातळी असतात काय ?

**उत्तर**–नाहीं. त्याची फक्त एकच पातळी असते.

**प्रश्न**–एखाद्या व्यक्तीच्या ठिकाणीं चैत्य-पुरुषाचा पुरेसा विकास झालेला नसेल तर त्या व्यक्तीला स्वतःच्या स्वभावांतील मूलभूत अडचणी उल्लंघितां येतात काय ?

**उत्तर**–नाहीं. स्वतःच्या सामर्थ्यानें तसें करतां येणार नाहीं. पण भगवत्कृपेच्या आधारानें त्या व्यक्तीला अशा अडचणी ओलांडतां येतात.

**प्रश्न**–चैत्यपुरुष एकदां पुरोभागीं आला म्हणजे साऱ्या शंकांचें आणि संकटांचें निर्मूलन झटकन् करतां येतें हें खरें आहे काय ?

**उत्तर**–होय.

**प्रश्न**–चैत्य-पुरुषास पुढें कसें आणावयाचें ? आंतरिक अयोग्य गति-वृत्ती टाळून हें करतां येणें शक्य आहे काय ?

**उत्तर**–नाहीं. ती नकारात्मक पद्धति झाली. भगवन्ताचें आज्ञापालन, त्याची भक्ति व त्याला समर्पण ही प्रत्यक्ष सक्रिय पद्धति होय.

**प्रश्न**–शारीरिक चेतना संस्कारक्षम करून चैत्य-पुरुषास पुढें आणणें व त्यास त्या स्थितींत नित्य ठेवणें शक्य आहे काय ?

**उत्तर**–नाहीं. उलट आध्यात्मिक व आंतरिक विकास झाल्यानें त्याचें जें शारीरिक चेतनेवर कार्य होतें त्याचा, शारीरिक चेतना संस्कारक्षम होणें, हा एक परिणाम असतो.

**प्रश्न**–अलीकडे मला बरेंच तीव्र असें दुःख वाटतें व त्यामुळें नेत्रांतून अश्रुप्रवाह सुरू होतो. त्यांत अस्वस्थता किंवा क्लेश असे कांहींच नसतात; उलट त्याच्याबरोबर एक प्रकारच्या स्थिरतेची नि शुद्धतेची भावना आणि कांहींसें अगाध गांभीर्य असतें. ज्याला 'आंतरात्मिक दुःख' म्हणतात तें हेंच काय ?

**उत्तर**–तशा प्रकारचें आंतरात्मिक दुःख असतें. तथापि आंतरात्मिक अश्रु हे दुःखद असण्याची गरज नाहीं, भावना व आनंद यामुळेंहि आंतरात्मिक अश्रु येतात.

—श्रीअरविन्द.

(Elements of yoga–वरून)

# साधकांना पत्रें

उपवासावर तुमची साधना अवलंबून ठेवणें ही मोठीच चूक आहे. पण तशी ती अवलंबून असावी असें ज्यांना वाटतें त्यांचीं मनें अस्वाभाविक अवस्थेंत वावरत असतात, अर्थातच त्यामुळें कल्पनाचित्रें व भ्रम यांनाच खरे अनुभव समजण्याची चूक त्यांच्याकडून सहजासहजीं घडते. अति उपासानें शेवटीं मज्जातंतूव्यूह निर्बल होऊन जातो. म्हणून अनेक दिवस ओळीनें उपवास करण्याची ही खोड तुम्हीं सोडून दिली पाहिजे. अत्याहार करणें ही योग-दृष्टीनें चूक आहेच; पण अत्यल्पाहार किंवा निराहार करणें हीहि चूकच आहे. तुम्हीं अत्याहार घेतलांत तर जडता आणि तामसिकता वाढते. जर तुम्हीं निराहार केलांत किंवा अति अल्प आहार घेतलांत तर, त्यायोगें तुमच्यांतील प्राणशक्ति तुम्ही चेतवितां आणि शेवटीं त्यांच्यांतील चैतन्य प्रमाणाबाहेरहि वाढतें; पण त्याचमुळें, तुमचें शरीर व मज्जासंस्था दुर्बळ होऊन जातात. साधनेच्या दृष्टीनें, दोन्ही गोष्टी वाईटच. तुमचा आहार नियमित, संयमित पण आवश्यक तितका, पुरेसा असावा. अपचन झालें असेल किंवा आजार असेल तर कमी अन्न घेणें अथवा अन्नाशिवाय थोडें राहणें आवश्यक असतें; तरीपण अशावेळीं सुद्धां, पोटाला विश्रांति देण्याच्या उद्देशानें केलेल्या उपवासाचाहि काळ एका दिवसापेक्षां अधिक होतां कामा नये.

तुमच्या साधनेच्या प्रगतीसाठीं हीं अशीं बाह्य साधनें उपयोगांत न आणतां, नीरवता, आणि प्रामाणिक, खरीखुरी व शांतपणानें केलेली अभीप्सा व श्रीमातृशक्तीस उन्मुखता यांचा उपयोग केला पाहिजे.

डिसेंबर १९३२

★

साधनेविषयीं जें कांहीं मीं तुम्हांला सांगितलें होतें त्याचें पुनः स्मरण करून देणें मला भाग पडत आहे. येथें राहून तुम्हांला साधना करावयाची असेल तर, तुम्ही आहार व निद्रा पुरेशी आणि योग्य प्रमाणांत घेतलीच पाहिजे. झोंपणें आणि खाणें थांबविण्याचा जर तुम्ही यत्न कराल किंवा आहार-निद्रेचें प्रमाण मर्यादेपेक्षां कमी कराल तर, तुमचा देह दुबळा होईल, तुमची प्राणशक्ति अस्वस्थ होईल व त्यायोगें अतिरिक्त स्वरूपाच्या, उच्छृंखल व अनिष्ट अशा त्यांच्या हालचालींचा प्रवेश तुम्हांमध्यें होऊं लागेल. यापुढें हें चांगलें ध्यानांत ठेवा.

२६-१-१९३३.

★

कर्म करतांना जर पूर्ण समर्पणवृत्ति असेल व तें कर्म श्रीमाताजींचेंच असून, तुम्हांमध्यें त्यांचीच शक्ति कार्य करत आहे अशी जिवंत भावना जर तुम्हांला वाटत असेल, तर थकवा येत नाहीं.

जुलै १९३३.

★

नित्याच्या बारीक-सारीक तपशिलाविषयींसुद्धां श्रीमाताजींनीं उत्तर द्यावें या उद्देशानें कांहीं श्रीमाताजींना साधक लिहीत नाहींत. जेव्हां कधीं आवश्यक असेल तेव्हां त्या उद्देशानें ते लिहितातहि; पण अशा वेळीं श्रीमाताजी उत्तर देतात किंवा देतहि नाहींत. पत्र लिहिण्याचा मुख्य उद्देश म्हणजे आपले अनुभव, प्रगति, एकंदर जीवन यांना, म्हणजेच स्वतःला श्रीमाताजींसमोर उभें करणें व त्यायोगें त्यांच्याशीं सततचा संबंध प्रस्थापित करून त्यांचा हस्तक्षेप व्हावा म्हणून त्यांचें सान्निध्य, शक्ति, मदत व प्रत्येक बाबतींतील मार्गदर्शन यांसाठीं आवाहन करणें, हाच असतो. पण त्याला प्रत्युत्तर म्हणून श्रीमाताजींनीं लेखी उत्तर दिलें पाहिजे असें नाहीं; आणि तसें पाहतां आम्हांला आलेल्या सर्व पत्रांना उत्तरें लिहावयाचीं म्हटलें तर चोवीस तास खर्च करूनहि तें शारीरिक, भौतिक दृष्टचा शक्यच होणार नाहीं. १२-१०-१९३३

★

साधना करतांना साधकाचे ठिकाणीं उच्चतर प्रकृतीचें कार्य चालतें. त्यावेळीं अंतःपुरुषाच्या, उच्चतर आध्यात्मिक आत्म्याच्या किंवा भगवंताच्या प्रभावाखालीं आपल्या स्वभावास राखण्याचा यत्न साधकाला करावा लागतो. केवळ प्राणाला आणि शरीराला नव्हे, तर मनालाहि दिव्य सत्य काय आहे हें जाणण्यास व दिव्य नियमनास मानण्यास आणि तदनुसार वर्तन करण्यास लावावें लागतें. पण हीन प्रकृतीमुळें व तिच्या एकसारख्या वर्चस्वामुळें सुरुवातीला व पुढेंहि बराच काळ या हीन प्रकृतीला तोंड देण्यास व जुनें वळण मोडण्यास ते समर्थ असत नाहींत; मग त्यांना आंतून 'अमुक कर, अमुक नको' असे आदेश मिळालेले असोत किंवा योग्यायोग्याचें ज्ञानहि झालेलें असो! केवळ अविरत निश्चयपूर्वक साधना करीत राहून, उच्चतर आध्यात्मिक जाणिवेंत आणि आध्यात्मिक प्रकृतींत प्रवेश करूनच ही अडचण दूर होऊं शकते; तरीपण अत्यंत समर्थ व उत्तम साधकांनासुद्धां आपल्या सामान्य प्रकृतीवर विजय मिळविण्यास बराच काळ लागतो.

बलवान् 'प्राण' म्हणजे कोणता? भरपूर प्राणशक्ति, महत्त्वाकांक्षा, धैर्य, अथक शक्ति, क्रियाशक्ति व नवनिर्माणशक्ति, तसेंच दातृत्वामधील उदारता किंवा सत्ताभिलाषा, नेतृत्वाची ओढ व वर्चस्व-भावना यांसारख्या, विशालतेकडे नेणाऱ्या प्रवृत्ती, हेतु-परिपूर्तीचें सामर्थ्य आणि आपल्या उद्दिष्टांना साकार करण्याची पात्रता या गोष्टी ज्यामध्यें असतात तो बलवान् प्राण — बलवान् प्राणशक्तीचे दुसरेहि कांहीं प्रकार असतात. अशा प्राणाकडून समर्पण घडणें हें पुष्कळ वेळां अतिशय कठीण काम असतें. कारण त्याला स्व-सामर्थ्याची चांगलीच जाणीव असते. पण जर कां अशा प्राणाकडून चांगल्या प्रकारें समर्पण घडलें तर तें भगवंताच्या दिव्य कर्माचें अत्युत्कृष्ट व कौतुकास्पद असें साधन बनतें.

SABCL : Vol 22 : Page 343

—श्रीअरविन्द

★

# दिव्य जीवन

## ग्रंथ–प्रकाशन–योजना

दिव्य जीवन ग्रंथाची छपाई सुरु झाली आहे. संजीवनच्या कांहीं वाचकांनीं विचारल्यावरून ग्रंथांतील विषयांची कल्पना येण्याकरतां पहिल्या खंडाची अनुक्रमणिका देत आहोंत. प्रसिद्धीपूर्वी रु.२५ भरून होणाऱ्या ग्राहकांची नोंद चालू आहे.

### –अनुक्रमणिका–


१ मानवी आकांक्षा
२ दोन नकार – जडवादी नकार
३ दोन नकार – संन्यासी नकार
४ सत्य सर्वव्यापी आहे
५ व्यक्तीची नियति
६ विश्वांत मानवाचें स्थान
७ अहम् आणि द्वंद्वें
८ वेदान्ती ज्ञानाचे मार्ग
९ शुद्ध सद्वस्तु
१० चिन्मय शक्ति
११ अस्तित्वाचा आनंद – प्रश्न
१२ अस्तित्वाचा आनंद – उत्तर
१३ दैवी माया
१४ अतिमानस (विज्ञान) हें सृष्टीची उभारणी करतें.
१५ परात्पर सत्य–संविद्
१६ अतिमानसाच्या तीन अवस्था
१७ दिव्य आत्मा
१८ मानस व अतिमानस
१९ प्राणशक्तिमय जीवन
२० मृत्यु, वासना व असामर्थ्य
२१ जीवनाची ऊर्ध्वगति
२२ जीवनाचा प्रश्न
२३ मानवांतील दोन आत्मे
२४ जडतत्त्व
२५ जडाची ग्रंथि
२६ चढती तत्त्वमालिका
२७ अस्तित्वाच्या सात तारा
२८ अतिमानस, मानस आणि अधिमानसी माया


## संजीवन कार्यालय

### श्रीअरविंद आश्रम, पाँडिचेरी